


# हॅलो प्रभात

PRGI NO. MAHMAR/25/A3118

■ संपादक : संजीव शाळगावकर

पुणे आवृत्ती

■ मुंबई ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे ■ वर्ष : ०१ ■ अंक : १६४ ■ शुक्रवार, १५ मे २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४+२



**भाड्याने देणे**

ऑफिससाठी उपयुक्त असा २५० स्के.फू.ब्लॉक भाड्याने देणे आहे.

•इंडोशिवा ॲसेट•

दुसरा मजला, गणपती मंदिरसमोर विश्रामबाग, सांगली.

संपर्क

7517219001
9011889001


# महाराष्ट्रात १.१४ लाख कोटींची गुंतवणूक

## ८,००० जणांना मिळणार रोजगार

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' समवेत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार झाला. मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या कराराच्या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एएम इंटेलिजन्स लॅब्जचे अध्यक्ष अनिल चलमलाशेट्टी, संचालक मौर्य पायदा, उपाध्यक्ष पंकज कुमार आदी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात तब्बल ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.



उद्योग विभाग आणि एएम इंटेलिजन्स लॅब यांच्यात सामंजस्य करार

या सामंजस्य करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी १,१४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल.उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डेटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स टीमचा समावेश असेल.

प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत सुमारे २ हजार अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. हा प्रकल्प ५०० मेगावॅट क्षमतेचा असून यामध्ये २,५०,००० उच्च क्षमतेचे 'एआय चिपसेट्स' वापरले जातील. तसेच या प्रकल्पाचा दोन टप्प्यांत विकास करण्यात येईल. २०० मेगावॅट क्षमतेचा पहिला टप्पा सन २०२८ पर्यंत तर ३०० मेगावॅट क्षमतेचा दुसरा टप्पा २०३० पर्यंत पूर्ण करण्यात येणार उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प राज्याच्या माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ तसेच हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क धोरण २०२४ अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात राष्ट्रीय व जागतिक स्तरावर अग्रस्थानी नेण्याचा उद्देश या प्रकल्पामागे आहे.

## विदर्भातील द्रुतगती महामार्ग प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करा : देवेंद्र फडणवीस

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्राची पूर्व व पश्चिम सीमा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने जोडण्यासाठी विदर्भातील ५४७ कि.मी.च्या चार प्रवेश द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. हे प्रकल्प जलदगतीने व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळचे



व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. अपर मुख्य सचिव म्हैसकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे प्रकल्पांची माहिती दिली.

महाराष्ट्राचे पूर्व व पश्चिम क्षेत्र जोडणारे आणि विदर्भातील विकासात महत्त्वाचे पाऊल ठरणाऱ्या या प्रकल्पांची पुढील कार्यवाही जलदगतीने करून प्रकल्प वेळेत होईल यावर भर द्यावा. नवेगाव मोर ते सुरजागड हा मार्ग खनिज वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हा मार्ग समृद्धी महामार्गाला जोडण्यात यावा, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. तसेच पश्चिम महाराष्ट्र ते कोकणाला जोडणाऱ्या टनेल रस्त्यासंदर्भात अभ्यास करून सादरीकरण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

## संक्षिप्त

### शासकीय वसतिगृहात विनामूल्य प्रवेशाचे आवाहन

**सांगली : हॅलो प्रभात**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, जत रोड, मेघराज टेकडी, कवठेमहांकाळ येथील रिक्त जागांवर सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी विनामूल्य प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पोर्टलद्वारे सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृह प्रशासनामार्फत प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

### महिला लोकशाही दिन सोमवारी

**सांगली : हेलो प्रभात**

जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला आहे. गरजू महिलांनी आपल्या तक्रारी व अडचणी मांडून शासकीय यंत्रणेमार्फत त्यांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, सेवा व आस्थापना विषयक बाबी तसेच सामूहिक स्वरूपाचे तक्रार अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वर्षा पाटील यांनी दिली.

### साताऱ्यात २३ मे रोजी माजी सैनिकांचा मेळावा

**सातारा : हॅलो प्रभात**

माजी सैनिकांच्या विविध समस्या व मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी १०९ इन्फंट्री बटालियन (टी. ए.) मराठा लाईट इन्फंट्री यांच्या वतीने माजी सैनिक मेळाव्याचे आयोजन दि. २३ मे २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ या वेळेत शेंद्रे फाटा, सातारा येथील श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यात कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांतील सुमारे ५ हजार माजी सैनिक सहभागी होणार आहेत.

## डॉ. संजय डी.पाटील यांचा 'द कॅप्टन्स व्हिजन अवॉर्ड'ने सन्मान

### सिम्युलेशन शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल गौरव

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सिम्युलेशन आधारित वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण योगदानाबद्दल डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना 'द कॅप्टन्स व्हिजन अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान एलिव्हेट हेल्थकेअरचे आंतरराष्ट्रीय संचालक रिचर्ड लिवसी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याच वेळी त्यांना 'अ पार्टनरशिप बिल्ट ऑन व्हिजन' हा पुरस्कारही देण्यात आला. विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित 'सेलिब्रेटिंग अ व्हिजन' या विशेष कार्यक्रमात हा सोहळा पार पडला. या वेळी विद्यापीठाचे प्र- कुलपती ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, डॉ. ए. के. गुप्ता यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



रिचर्ड लिवसी यांच्या हस्ते सन्मान

रिचर्ड लिवसी यांनी डॉ. संजय पाटील यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना म्हटले की, डी. वाय. पाटील विद्यापीठातील सिम्युलेशन अँड स्किल सेंटर हे जागतिक दर्जाचे असून, वैद्यकीय शिक्षणात आधुनिक सिम्युलेशन पद्धतीचा उत्कृष्ट नमुना आहे. कोविड काळातही या केंद्राची सुरुवात करून त्यांनी धाडसी निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

या केंद्रामार्फत आतापर्यंत ३४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून २,५८६ प्रशिक्षण कार्यक्रम आणि १ लाखाहून अधिक तासांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी विद्यापीठाच्या जागतिक ओळखीमध्ये डॉ. संजय पाटील यांच्या विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोनाचा मोठा वाटा असल्याचे सांगितले.

पुरस्कार स्वीकारताना डॉ. संजय पाटील यांनी सिम्युलेशन आधारित शिक्षणामुळे आरोग्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याचे सांगितले. भविष्यात नव्या मेडिकल कॉलेज इमारतीत सिम्युलेशन सेंटरचा विस्तार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात सिम्युलेशन सेंटरच्या कामगिरीचा आढावा सादर करण्यात आला. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यात काटकसरीचा नवा फॉर्म्युला

### मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्या निम्म्या, परदेश दौऱ्यांनाही ब्रेक

**मुंबई : हॅलो प्रभात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडील आवाहनानंतर इंधन आणि परकीय चलन वाचवण्याच्या प्रयत्नात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १३ मे रोजी मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या दोन उच्चस्तरीय बैठकांमध्ये मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी कठोर उपाययोजना जाहीर केल्या.

या महत्त्वाच्या निर्णयानुसार मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तात्काळ निम्म्याने कमी करणे बंधनकारक आहे. परदेश प्रवासासह या आदेशाचे पालन सुनिश्चित करण्याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांवर सोपवण्यात आली आहे.



मंत्री आणि अधिकाऱ्यांना सर्व परदेश दौरे रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, तर शासकीय विमाने आणि हेलिकॉप्टरचा वापर केवळ तातडीच्या कामांपुरताच मर्यादित राहील. शक्य असेल तिथे नियमित व्यावसायिक विमानांचा वापर करावा.

प्रशासन अनावश्यक होर्डिंग्ज, फ्लेक्स बॅनर आणि सजावटीच्या दिव्यांमध्ये कपात करून ऊर्जा कार्यक्षमतेला प्राधान्य देईल. याव्यतिरिक्त, जिथे शक्य असेल तिथे प्रत्यक्ष भेटीगाठींऐवजी बहुतेक अधिकृत बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतल्या जातील.

सार्वजनिक वाहतुकीला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी, मंत्री आणि अधिकाऱ्यांनी मेट्रोसारख्या सेवांचा वापर करावा अशी अपेक्षा आहे, ज्यासाठी किमान एक दिवस प्रायोगिक उपक्रम म्हणून निश्चित करण्यात आला आहे. सर्व शासकीय वाहनांचा पुरेपूर वापर सुनिश्चित करण्यासाठी त्यांचे सविस्तर ऑडिटही केले जाईल.

हे उपाय राज्य सरकारची आर्थिक विवेकबुद्धी, पर्यावरणीय जबाबदारी आणि कार्यक्षम प्रशासनाप्रती असलेली वचनबद्धता दर्शवतात, तसेच ते ऊर्जा संवर्धन आणि खर्च कपातीसाठीच्या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांशी सुसंगत आहेत.

## सांगलीत ६५७ विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती



चंद्रकांत पाटील व सम्राट महाडीक यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण

**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात सांगली जिल्ह्यातील ६५७ उमेदवारांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. यापैकी १०० नवनियुक्त विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि भाजप सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडीक यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्ती प्रमाणपत्र व शियांचे वितरण करण्यात आले.

यावेळी नव्याने नियुक्त झालेल्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या, कामकाजाची पद्धत तसेच नागरिकाभिमुख प्रशासनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशासन अधिक प्रभावी व गतिमान करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

याच कार्यक्रमात महसूल प्रशासन अधिक सक्षम आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्याच्या दृष्टीने महसूल उपविभागीय अधिकाऱ्यांना व्हिडिओ कॉन्फरन्स सिस्टीमचेही प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले. या प्रसंगी आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी मैनाक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी स्नेहल कनिचे, विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, उपविभागीय अधिकारी रणजीत भोसले, श्रीनिवास अर्जुन, अजयकुमार नष्टे, समाधान शेंडगे, तहसीलदार लिना खरात यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## गोकुळच्या मलईवर राजकारण्यांचा डोळा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गोकूळ दूध संघास दूध पूरवठा करणाऱ्या ग्रामीण भागातील खऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मनातील खदखद आता उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि त्यांना योग्य दर मिळावा या उद्देशाने स्थापन झालेल्या सहकारी दूध संघांच्या मूळ उद्दिष्टालाच हरताळ फासला जात असल्याची भावना दूध उत्पादकांमध्ये तीव्र होत आहे. राजकारण्यांचा गोकुळच्या मलईवर डोळा आहे, त्यामुळे सहकारातून समृद्धी या उद्दिष्टालाच आता हरताळ फासला जात आहे. परिणामी राजकारण्यांच्या या धडपडीमुळे गोकुळ सारख्या प्रतिष्ठित दूध संघाच्या कारभारावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

## अध्यात्मिक नृसिंहवाडीला लगीन सराईची झाक

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

अध्यात्मिक आणि दत्त संप्रदायाची मोठी परंपरा लाभलेल्या शिरोळ तालुक्यातील कृष्णा नदीच्या काठावर वसलेल्या पवित्र नृसिंहवाडी नगरीला गेल्या दोन दिवसांपासून लगीन सराईची अनोखी झाक प्राप्त झाली आहे. अधिक महिना सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला म्हणजेच आज १४ ऑगस्ट रोजी येथे तीसहून अधिक लग्नसोहळे अत्यंत उत्साहात आणि धार्मिक वातावरणात संपन्न झाले.

मध्यवर्ती व सोयीस्कर स्थान, धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व, सात्विक जेवणाची सुविधा तसेच लग्नाच्या सर्व तयारी एकाच ठिकाणी



उपलब्ध होत असल्याने पश्चिम महाराष्ट्रापासून ते पुण्यापर्यंतच्या अनेक वधू-वर परिवारांनी नृसिंहवाडीत विवाहसोहळा पार पाडण्यास प्राधान्य दिले.

सकाळपासूनच मारुती मंदिरात दर्शनासाठी घोड्यावरून येणाऱ्या नवरदेवांची रेलचेल दिसून आली. लग्नाच्या गर्दीचा अंदाज यावरून येतो की, एकाच घोड्याला तीन ते चार नवरदेवांना मारुती दर्शनासाठी घेऊन जावे लागले. दुपारनंतर सायंकाळी उशिरापर्यंत नवविवाहित दाम्पत्ये वाड्या-करवल्यांसह मंदिरात दर्शनासाठी येत असल्याचे चित्र संपूर्ण परिसरात दिसत होते. वाढत्या गर्दीची दखल घेत एसटी महामंडळाने इचलकरंजी, जयसिंगपूर व कोल्हापूर मार्गावर जादा बसगाड्या सोडल्या. कोल्हापूर ते सांगली परिसरातून वाजंत्री, स्वयंपाकी व वाढपी यांच्यासह विविध सेवा पुरवठादार मोठ्या संख्येने नृसिंहवाडीत दाखल झाले होते.

एकंदरीतच अध्यात्मिक आणि धार्मिक परंपरेने समृद्ध असलेल्या नृसिंहवाडी परिसराला लगीन सराईची ही झाक स्थानिक व्यापारी, हॉटेलचालक, फूल विक्रेते आणि इतर उद्योग-व्यावसायिकांसाठी मोठी पर्वणी ठरली.

## आटपाडी येथे १५ मे रोजी रोजगार मेळावा

**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली व श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन दि. १५ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आटपाडी येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यात १८ ते ४० वयोगटातील बेरोजगार व रोजगार इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त इनुजा शेख यांनी केले आहे.




श्री.विनोद नामदेव जवरे

कोपरगांव प्रतिनिधी

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा!


शुभेच्छुक

हॅलो प्रभात वृत्तपत्र समुह

मुंबई, पुणे, अहिल्यानगर, सांगली, कोल्हापूर

## संपादकीय


# काटकसरीच्या हाकेतून उभे राहिलेले प्रश्न



देशाच्या अर्थकारणावर वाढत्या जागतिक तणावाचे सावट गडद होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला काटकसरीचे आवाहन केले आणि त्यानंतर देशभरात विविध स्तरांतून चर्चा सुरू झाली. पेट्रोल-डिझेलचा कमी वापर करा, सोने खरेदी टाळा, आयातीवरील अवलंबित्व कमी करा, बचतीला प्राधान्य द्या, असे संदेश सरकारकडून दिले जात आहेत. मात्र या आवाहनाचा खरा अर्थ काय, त्याची झळ कोणाला बसणार आणि त्याचे दूरगामी परिणाम काय असतील, याविषयी समाजमनात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. जागतिक बाजारपेठेतील अस्थिरता, होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव, तेल व नैसर्गिक वायू पुरवठ्यात आलेली अनिश्चितता आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाचे घसरते मूल्य यामुळे भारतासारख्या आयातप्रधान अर्थव्यवस्थेवर दबाव वाढत आहे. भारताचा मोठा व्यापार अमेरिकन डॉलरमध्ये होत असल्याने परकीय चलनसाठ्यावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे आयात खर्च कमी करण्यासाठी सरकार जनतेला संयम आणि काटकसर यांचे धडे देताना दिसत आहे. परंतु आर्थिक संकटाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यागाची जबाबदारी सामान्य जनता, शेतकरी आणि मध्यमवर्गीयांवरच का येते, हा प्रश्न अधिक तीव्रतेने समोर येत आहे. आज शेतकरी आधीच अनेक संकटांशी झुंज देत आहे. शेतीमालाला हमीभाव नाही, उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे आणि नफ्याचे गणित पूर्णपणे कोलमडले आहे. दुधाचा उत्पादन खर्च लिटरमागे पन्नास रुपयांच्या आसपास असताना बाजारभाव चाळीस रुपयांखाली मिळत असल्याची तक्रार शेतकरी करीत आहेत. कांदा उत्पादकांना कवडीमोल दराने माल विकावा लागल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. अशा वेळी 'कमी वापरा, बचत करा' हा संदेश त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरत आहे. सरकारकडून रासायनिक खतांचा वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते, परंतु सेंद्रिय शेतीला आवश्यक ते प्रोत्साहन, बाजारपेठ आणि पायाभूत सुविधा अद्याप पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. सौरऊर्जा, स्थानिक उत्पादन आणि देशी तेलबिया वाढविण्यासाठी प्रभावी धोरणात्मक पाठबळ अपेक्षित असताना आयात नियंत्रणाऐवजी वापर कमी करण्याची भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचे पाच ट्रिलियन डॉलरचे स्वप्न दाखविले जाते, विकसित भारत २०४७ ची संकल्पना मांडली जाते; परंतु त्यासाठी आवश्यक उत्पादकता वाढ, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण याकडे तितक्या गांभीर्याने पाहिले जात आहे का, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. कारण केवळ खर्च कमी करून अर्थव्यवस्था सबळ होत नाही; उत्पादन, गुंतवणूक, रोजगार आणि खरेदीक्षमता यांचाही समतोल आवश्यक असतो. जर जनतेनेच खर्च कमी केला, तर बाजारपेठेतील मागणी घटेल आणि त्याचा फटका उद्योग, व्यापार व रोजगाराला बसू शकतो. इतिहासात संकटसमयी देशाने त्यागाची उदाहरणे पाहिली आहेत. दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी अन्नटंचाईच्या काळात स्वतः आठवड्यातील एक वेळचे जेवण टाळत देशवासीयांना संयमाचे आवाहन केले होते. महाराष्ट्राने १९७२ च्या दुष्काळानंतर हरितक्रांतीचा मार्ग स्वीकारला. रोजगार हमी योजनेची संकल्पना उदयास आली. त्या उपाययोजनांमध्ये लोकसहभागासोबत शासनाची जबाबदारी आणि नेतृत्वाचे उदाहरणही स्पष्ट दिसत होते. त्यामुळे त्यागाला नैतिक अधिष्ठान लाभले. आजही परिस्थिती गंभीर असेल, तर काटकसरीची सुरुवात सत्ताकेंद्रांपासून झाली पाहिजे. पंतप्रधानांनी स्वतःच्या वाहन ताफ्यात कपात केल्याच्या बातम्या समोर येत असल्या तरी राज्य व केंद्रातील इतर यंत्रणांमध्ये त्याचे प्रतिबिंब दिसणे आवश्यक आहे. मंत्री, आमदार, वरिष्ठ अधिकारी यांच्यासाठी तैनात असलेली अनेक वाहने, सुरक्षा ताफे, सायरन संस्कृती, अनावश्यक शासकीय खर्च आणि पदाधिकाऱ्यांच्या दिमतीला असलेली यंत्रणा यावर कठोर पुनर्विचार झाला पाहिजे. लोकांना काटकसरीचे धडे देताना सत्ताधाऱ्यांनीही त्यागाचे उदाहरण घालून दिले, तरच जनतेला त्या आवाहनात प्रामाणिकपणा जाणवेल. एकेकाळी 'महाराष्ट्र अतिथी नियंत्रण आदेश' लागू करून लग्नसमारंभ आणि जेवणावळींवर निर्बंध घालण्यात आले होते. त्या वेळी टंचाईची परिस्थिती सर्वांनी मिळून स्वीकारली होती. आज परिस्थिती वेगळी असली तरी परकीय चलन वाचविणे, आयात कमी करणे आणि देशांतर्गत उत्पादन वाढविणे यासाठी व्यापक राष्ट्रीय धोरणाची गरज आहे. मात्र त्याची किंमत केवळ सामान्यांनीच मोजावी, अशी भावना समाजात निर्माण होऊ नये. देश संकटातून बाहेर काढण्यासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो; पण तो सहभाग न्याय्य, समतोल आणि सर्वसमावेशक असला पाहिजे. काटकसर ही केवळ गरीब, मध्यमवर्गीय आणि शेतकरी यांच्यासाठीच असते, अशी भावना वाढत गेली तर त्यातून असंतोष निर्माण होऊ शकतो. लोकांनी त्याग करावा, अशी अपेक्षा असेल तर सत्ताधाऱ्यांनीही त्यागाचे दर्शन घडविले पाहिजे. अन्यथा काटकसरीची हाक ही जनतेसाठी आदेश आणि सत्तेसाठी अपवाद ठरेल.

# राजधानीचे वैभव : देवगिरी (दौलताबाद )

**दै. हॅलो प्रभात**



या गडाची समुद्रसपाटीपासूनची उंची ९०१ मीटर उंचीवर आहे. देवगिरी जरी उंचीने थोडा असला तरी दिमाखात व डौलात उभा आहे. हा गड औरंगाबादपासून पंधरा कि. मी. अंतरावर आहे. आपण देवगिरी या ठिकाणी आल्यानंतर किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर रस्त्यापलीकडे शाही स्नानगृहे म्हणजे शाही हमाम आहे. जी आजही राजवैभवाची साक्ष देत उभी आहेत. यानंतर किल्ल्यात प्रवेश मुख्य प्रवेशद्वारातून केल्यानंतर 'महाकोट' ही भव्य दिव्य वास्तू नजरेस पडते. महाकोट म्हणजे सर्वात मोठी भिंत या किल्ल्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे या किल्ल्यात असलेले प्रवेशद्वार किंवा अन्य दरवाजे मनुष्य लोटू शकत नाही ही द्वारांची खासियत आहे. महाकोटमध्ये आल्यानंतर सैनिकांसाठी किल्ल्यात ज्या लहान लहान खोल्या केल्या आहेत त्या ठिकाणी आपल्या नजरेस पडतात. त्या खोल्यांमध्ये आता धातूंच्या तोफा ठेवलेल्या आहेत.

आपण हे पाहून पुढे गेल्यानंतर टेहळणी बुरूज आपल्या नजरेस पडतो. बुरुजाची भव्यता व भक्कमपणा यावरून बांधकामाचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन आपल्याला घडते.

यानंतर आपण पुढे गेल्यानंतर किल्ल्यातील सर्वात मोठी विहीर ज्या विहिरीला 'सरस्वती कुआँ' म्हणून ओळखले जाते व त्या जवळील भागातच जैन मंदिर देखील आपल्या नजरे पडते. आपण किल्ल्याची भव्यता व सौंदर्य न्याहळत असताना पुढे हाथी हौद व तेथून थोडेच अंतरावर जवळच भारत माता मंदिर दृष्टीस पडते. शिल्पकलेचा व प्राचीन कलेचा, वैभवाचा उत्कृष्ट ठेवा हे मंदिर आहे. वास्तवात हे मंदिर जैन मंदिर होते; पण हे 'भारतमाता मंदिर 'म्हणून ओळखले जाते. या मंदिरात भारत मातेची सुंदर, आकर्षक व मोठ्या स्वरूपाची मूर्ती आहे. हे पाहून आपण पुढे चढत गेल्यास आपणास राजधानीच्या वैभवाची साक्ष देणारा चाँदमिनार दिसतो. या मिनाराबद्दल विशेष म्हणजे कुतुबमिनारानंतर नाव घेतात ते या चाँदमिनाराचे. या चाँदमिनाराची उंची सत्तर मीटर आहे. इ. स. १४३५ अलाउद्दीन बहमनी (दुसरा) याने आपल्या विजयाची स्मृती म्हणून बांधला; पण या मिनाराची उंची किल्ल्यापेक्षा कमी आहे. या मिनारावर उभे राहिले तर किल्ल्याची सुंदरता, भव्यता आपल्याला न्याहळता येते. याच मिनाराच्या थोडेसे पुढे चालत गेल्यास पुरातत्त्व खात्याने किल्ल्यातील सापडलेले शिल्प एकत्रित करवून शिल्प संग्रहालय साकारले आहे. या संग्रहालयात विविध धर्मातील देवांचे शिल्प व अन्य सुंदर शिल्प कलाकृती पाहावयास मिळतात. हे पाहून पुढे गेल्यानंतर आपल्या नजरेस पडतो तो कालाकोट या नावाचा दरवाजा या दरवाजाचे वैशिष्ट्य म्हणजे शत्रुला या दरवाजातून प्रवेश मिळणे त्याकाळी अशक्य असे आणि दुसरे म्हणजे हा या दरवाजाचा भक्कमपणा अजूनही तसाच टिकून आहे. दरवाजातून प्रवेश केल्यानंतर आत आल्यावर समोर दृष्टीस पडतो तो चिनी महल या चिनी महलला चिनी मातीच्या तुकड्याचा उपयोग फरश्यांसाठी या महलात केला आहे. या महलाच्या भिंतीवर त्यावेळचे रंगकाम अजूनही आहे. हा चिनी महल पर्यटकांना भुरळ घालतो. तो नजरेत साठवत पुढे गेल्यास नंतर अहमदनगरच्या निजामशाहीच्या अधिकाऱ्यांनी या किल्ल्यावर बरेच महाल बांधले. त्यापैकीच किल्ल्यावर 'निजाम शाही महल' म्हणून तिथे तो आपणास पाहावयास मिळतो.




निजामशाही महालासमोरच एका गोल चबुतऱ्यावर काही पायऱ्या चढून गेल्यावर आपणास तोफ दिसते. हिच्या मागील बाजूस मेंढीची आकृती असल्याने या तोफ `स 'मेंढा तोफ' म्हणतात. या तोफेवर लेख लिहिलेला आहे. या लेखात औरंगजेबाचा अधिकारी मोहम्मद हुसेन अरबी याची कारकिर्दी सांगितलेली आहे. ही तोफ फार प्रसिद्ध आहे. आपण ही मेंढा तोफ पाहून बालेकिल्ल्या भोवतीच्या खंदकापाशी पोहोचायचं. हा खंदक डोंगरातच खोदून काढलेला असून, १६ मीटर रुंद आहे. याच्या माथ्यावर पोहोचल्यावर देवगिरीचे चखोट ताशीव कडे आपले लक्ष वेधून घेतात. कड्यांचा ताशीवपणाबद्दल इ. स. १३४० या किल्ल्याला भेट देणाऱ्या इब्जबतुताने मोठे मार्मिकपणे लिहून ठेवलेले आहे. ते असे की 'शत्रूलाच काय, तर सापांना आणि मुंगीलाही हा सरळसोट ताशीव व निसरडा कडा चढून जाणे दुष्कर आहे.'

या किल्ल्याचा बालेकिल्ला हा दोनशे मीटर उंचीचा पटावरच्या सोंगटीसारखा दिसतो. बालेकिल्ल्यात प्रवेश करताना 'अंधेरी' लागते.

अंधेरी म्हणजे अंधारी रस्ता खंदक पार करताच अंधेरीची सुरुवात होते. उजेडाशिवाय किंवा काहीही प्रकाशाचे साधन न आणता अंधेरी पार करणे अवघडच दिव्य. हा मार्ग ३७ मीटर लांब भुयारी मार्ग आहे. याला 'मशाल बंगला'ही म्हणतात. अंधेरीपासून वर चढत गेल्यास गणेश मंदिर लागते व त्यानंतर बारादरी आणि त्यानंतर सर्वात वरती दुर्गातोफ आहे.

या किल्ल्यात फसव्या वाटा व घुसखोरांना जाळून टाकणारा तवा आहे. गार वारा येणाऱ्या वाटेवर गेले, तर सुसरी-मगरीच्या खंदकातच रवानगी, याशिवाय न दिसणाऱ्या झरोक्यातून शत्रूच्या अंगावर उकळते तेल ओतण्याचे ठिकाणही येथे आहे. असा हा किल्ला अजिंक्य आहे. कोणी फितूर झाले तरच जिंकणे शक्य. संत एकनाथ महाराजाचे गुरू जनार्दन स्वामींची येथे समाधी आहे व रसोईमातेचे मंदिर देखील. असा हा एकमेवाद्वितीय देवगिरीचा किल्ला पाहणे, त्याचा इतिहास अभ्यासणे हा मोठा विलक्षण अनुभव आहे. प्रत्येक दुर्गप्रेमीने या दुर्गाला आवर्जून भेट दिलीच पाहिजे.

•प्रा.साईप्रसाद कुंभकर्ण
इतिहास अभ्यासक,व्याख्याते



# कॉईनडीसीएक्सकडून पोलिसांना 'क्रिप्टो' तपासाचे प्रशिक्षण

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील अग्रगण्य 'क्रिप्टो' व्यवहार मंच कॉईनडीसीएक्सने मीरा-भाईदर आणि वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांसाठी 'क्रिप्टो' तपास आणि आभासी डिजिटल मालमत्ता जागरूकता प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित केला.

वेगाने विकसित होत असलेल्या आभासी डिजिटल मालमत्ता क्षेत्राबाबत जागरूकता निर्माण करणे आणि ज्ञानातील तफावत कमी करणे, या उद्देशाने कायदा अंमलबजावणी यंत्रणांसोबत सुरू असलेल्या सहकार्याचा हा भाग असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले. सातत्यपूर्ण क्षमता-विकास उपक्रमांद्वारे अधिकाऱ्यांना तांत्रिक ज्ञान आणि तपास कौशल्ये प्रदान करून वाढत्या सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी सक्षम करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.



या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात 'क्रिप्टो' आधारित आर्थिक गुन्हे आणि आधुनिक सायबर फसवणुकीचे स्वरूप यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

डिजिटल मालमत्ता 'ब्लॉकचेन' प्रणालीवर नेमक्या कशा कार्य करतात, तसेच त्याद्वारे होणाऱ्या गुन्ह्यांचे वर्गीकरण कसे करावे, याबाबत अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली.

# भारती एअरटेलची चौथ्या तिमाहीत दमदार कामगिरी

**मुंबई : हॅलो प्रभात**


भारती एअरटेल लिमिटेडने मार्च २०२६ अखेरच्या तिमाहीत मजबूत आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचा एकत्रित महसूल ५५,३८३ कोटी रुपयांवर पोहोचला असून, त्यात वार्षिक आधारावर १५.७ टक्क्यांची वाढ झाली आहे.

भारतामधील मोबाईल व्यवसायात ग्राहकसंख्या आणि प्रति ग्राहक सरासरी महसूल वाढल्याने कंपनीच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली. एअरटेलचा एआरपीयू २५७ रुपयांवर पोहोचला असून पोस्टपेड ग्राहकसंख्येतही सातत्याने वाढ झाली आहे. कंपनीने ६५० दशलक्ष ग्राहकांचा टप्पा पार करत जगातील दुसऱ्या क्रमांकाची दूरसंचार कंपनी म्हणून स्थान अधिक मजबूत केले आहे. ५जी सेवा विस्तार, फायबर नेटवर्क, डेटा सेंटर आणि डिजिटल आर्थिक सेवांमध्ये कंपनीने मोठी गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. तसेच भविष्यातील डिजिटल गरजांसाठी सक्षम नेटवर्क उभारण्यावर भर देण्यात येणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

# यूडब्ल्यूए इंडियाकडून ऐतिहासिक शिष्यवृत्ती योजनेची घोषणा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांनी यूडब्ल्यूए इंडियाच्या माध्यमातून भारतातील विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक शिष्यवृत्ती योजनेची घोषणा केली आहे.



भारतातील शैक्षणिक क्षेत्रातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्वतंत्र शिष्यवृत्ती कटिबद्धता मानली जात असून गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण अधिक सुलभ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे कुलगुरू प्रा. अमित चकमा म्हणाले, या उपक्रमातून भारताप्रती यूडब्ल्यूएची दीर्घकालीन बांधिलकी स्पष्ट होते. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना अडथळा येऊ नये, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यूडब्ल्यूए इंडियासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून मुंबई आणि चेन्नई येथील शैक्षणिक केंद्रांमधून विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित, वाणिज्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. हे अभ्यासक्रम जागतिक उद्योगांच्या गरजांनुसार तसेच भारतातील बदलत्या रोजगारक्षेत्राशी सुसंगत असतील.

या बहुपातळी शिष्यवृत्ती आराखड्यात गुणवत्ता शिष्यवृत्ती, जागतिक उत्कृष्टता शिष्यवृत्ती, सामाजिक समता व सामाजिक उत्तरदायित्व निधी तसेच राज्य सरकारांच्या सहकार्याने उपलब्ध होणाऱ्या संधींचा समावेश आहे. पात्र विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक प्रकारच्या आर्थिक सहाय्याचा लाभ घेण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विद्यार्थी अधिक माहितीसाठी आणि अर्ज प्रक्रियेसाठी यूडब्ल्यूए इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकतात.

# फेडएक्स आणि सीएसकेकडून सामाजिक समावेशकतेचा संदेश

**मुंबई : हॅलो प्रभात**



फेडरल एक्सप्रेस कॉर्पोरेशनने चेन्नई सुपर किंग्स आणि मुंबई व्हीलचेयर क्रिकेट संघ यांच्यात विशेष संवाद सत्राचे आयोजन केले. या उपक्रमातून सामाजिक समावेशकता आणि जिद्दीचा संदेश देण्यात आला. या सत्रात सीएसकेचे खेळाडूंनी मुंबई व्हीलचेयर क्रिकेट संघातील खेळाडूंशी संवाद साधला. क्रिकेटप्रती असलेली आवड, संघर्ष आणि चिकाटी याविषयी अनुभवांची देवाणघेवाण करण्यात आली. फेडएक्सच्या 'फेडएक्स केअर्स' उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात कंपनीचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

# अदाणी एअरपोर्ट आणि आयएचजीमध्ये करार

**मुंबई : हॅलो प्रभात**



अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड आणि आयएचजी हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स यांच्यात भारतातील प्रमुख विमानतळ परिसरात पाच हॉटेल्स विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण करार झाला आहे. या कराराअंतर्गत आयएचजीच्या विविध ब्रँड्सखाली १,५०० हून अधिक खोल्यांची सुविधा उभारण्यात येणार असून, हा आयएचजीचा भारतातील सर्वात मोठा हॉटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन करार मानला जात आहे. या प्रकल्पामध्ये जयपूर येथे 'किम्पटन' ब्रँडचे हॉटेल उभारण्यात येणार असून, या ब्रँडचा भारतातील हा पहिलाच प्रवेश ठरणार आहे. याशिवाय नवी मुंबई, मंगलुरू आणि तिरुवनंतपुरम येथे 'हॉलिडे इन' आणि 'हॉलिडे इन एक्सप्रेस' हॉटेल्स विकसित करण्यात येणार आहेत.

# पीएनजी ज्वेलर्सचा 'स्वर्ण स्वराज' उपक्रम जाहीर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पीएनजी ज्वेलर्सने 'स्वर्ण स्वराज' या राष्ट्रहिताच्या उपक्रमाची घोषणा केली आहे. घराघरांत निष्क्रिय पडून असलेले सोने पुन्हा अर्थप्रवाहात आणणे, सोन्याच्या आयातीवरील देशाचे अवलंबित्व कमी करणे आणि जबाबदार पद्धतीने सोन्याचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोन्याच्या खरेदीत संयम बाळगण्याचे केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे कंपनीने सांगितले. १८३२ मध्ये स्थापन झालेल्या पीएनजी ज्वेलर्सने गेल्या १९४ वर्षांत विविध ऐतिहासिक टप्प्यांत देशासोबत वाटचाल केली असून ग्राहकांशी विश्वासाचे नाते जपले आहे.

# क्लीनमॅक्सचा नफा ४.४ पट वाढला

## नवीकरणीय ऊर्जा पोर्टफोलिओ ५.७ GW वर

**मुंबई : हॅलो प्रभात**

Clean Max Enviro Energy Solutions Limited या व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रातील नवीकरणीय ऊर्जा पुरवठादार कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचा करानंतरचा निव्वळ नफा मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ४.४ पट वाढून ८५.६ कोटी रुपयांवर पोहोचला असून महसूल २८ टक्क्यांनी वाढून १,९१३ कोटी रुपये झाला आहे.

कंपनीचा EBITDA देखील २८ टक्क्यांनी वाढून १,२९५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. ३१ मार्च २०२६ अखेर कंपनीने ५.७ GW क्षमतेचा करारित नवीकरणीय ऊर्जा वीजविक्री पोर्टफोलिओ उभारला असून चालू आर्थिक वर्षात सुमारे १.४ GW क्षमता कार्यान्वित करण्यात आली आहे.




डेटा सेंटर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र कंपनीसाठी मोठा वाढीचा आधार ठरत असून या विभागाचा कंपनीच्या एकूण करारित पोर्टफोलिओमध्ये ४२ टक्के वाटा असल्याचे सांगण्यात आले.

कंपनीने Apple सोबत १५० MW नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पासाठी सुमारे १०४ कोटी रुपयांची धोरणात्मक भागीदारी केली आहे. तसेच STT Global Data Centres, Iron Mountain Data Centers आणि Princeton Digital Group यांसारख्या आघाडीच्या डेटा सेंटर कंपन्यांबरोबरही दीर्घकालीन करार करण्यात आले आहेत.

# पुण्यात बांधकाम क्षेत्रातील मान्यवरांकडून नावीन्य आणि शाश्वततेवर भर

**पुणे : हॅलो प्रभात**



मुंबई येथे ३ ते ५ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या 'वर्ल्ड ऑफ काँक्रीट इंडिया'च्या १२ व्या आवृत्तीच्या पार्श्वभूमीवर इन्फॉर्मा मार्केट्सतर्फे पुण्यात विशेष गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत पुणे आणि पश्चिम भारतातील वेगाने वाढणाऱ्या पायाभूत सुविधा, नव्या बांधकाम साहित्याची गरज आणि शाश्वत बांधकाम पद्धती यावर सखोल चर्चा करण्यात आली.

या परिषदेत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, पुणेचे राज्य सचिव मनोज देशमुख, आर्किटेक्ट्स इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेयर्स असोसिएशनचे अध्यक्ष महेश बांगड, इंडस्ट्रियल फ्लोअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष तथा ॲव्हकॉन टेक्निक्सचे व्यवस्थापकीय संचालक अजय सिंगम, आयजीएसचे वरिष्ठ संचालक सुयोग केळुस्कर, सिका इंडियाचे संचालक जसवंत शोभना, बी. जी. शिर्के बांधकाम तंत्रज्ञान विभागाचे महाव्यवस्थापक आप्पासाहेब भोसले आणि इन्फॉर्मा मार्केट्स इंडियाचे वरिष्ठ गट संचालक रजनीश खट्टर यांचा सहभाग होता.

काँक्रीट क्षेत्रातील देशातील सर्वसमावेशक प्रदर्शन मानल्या जाणाऱ्या या प्रदर्शनात यंदा ३५० हून अधिक देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार असून १८ हजारांहून अधिक व्यावसायिक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय : स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१.(महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.

■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at S.No.14/15/2/3, Flat No.20, Shivpushpa, A Park, Vadgaon B. Pune- 411041 **- Editor : Sanjeev Shalgaonkar**

■ **कोल्हापूर कार्यालय :** गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२ ■ **सांगली कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६

■ **मुंबई कार्यालय :** सी-५०३, निर्मल रेसिडेन्सी, कात्रप रोड, गणेश घाट, बदलापूर (पू), ठाणे - ४२१५०३. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर ■ संपर्क : 8551055113

## पेशवेकालीन भूमिगत जलवाहिनी जीर्णोद्धारास मंजुरी

**पुणे : हॅलो प्रभात** : पेशवेकालीन कात्रज ते शनिवारवाडा भूमिगत जलवाहिनीचा जीर्णोद्धार आणि संवर्धन केले जाणार आहे. त्यावर आज स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आला आहे. या प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर या जीर्णोद्धाराच्या कामासाठी सर्वेक्षण करून प्रकल्प आराखडा तयार केला जाणार आहे. पेशव्यांच्या काळात उभारण्यात आलेली कात्रज-शनिवारवाडा जलवाहिनी ही त्या काळातील अभियांत्रिकी आणि पाणी पुरवठ्याच्या नियोजनाच्या कौशल्याचा उत्कृष्ट नमुना मानली जाते. कात्रज तलावातून नैसर्गिक उताराच्या साहाय्याने सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेल्या शनिवारवाडा परिसरात भूमिगत दगडी आणि मातीच्या पाइपद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. त्या काळातील वैज्ञानिक दृष्टीकोन आणि नियोजनबद्ध जलव्यवस्थेचे हे वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण असल्याचे समितीत नमूद करण्यात आले. आता ही या जलवाहिनीतून जलप्रवाह सुरु आहे. दरम्यान शहरात अनेक ठिकाणी बांधकाम करताना किंवा महापालिकेतर्फे विविध विकास कामे करताना ही जलवाहिनी आढळते, काही वेळा त्यात नुकसान ही झाले आहे. पण या ऐतिहासिक जलवाहिनीचे संवर्धन करण्यासाठी महापालिकेने ठोस पाऊल उचलले नाही. त्यामुळे हा ठेवा धोक्यात आला आहे. नगरसेवक सुहास टिंगरे यांनी यासंदर्भात आज स्थायी समितीच्या बैठकीत प्रस्ताव मांडला होता. त्यास मंजुरी देण्यात आली आहे. या जलवाहिनीचे अनेक भाग दुर्लक्षित अवस्थेत आहेत, याकडे लक्ष दिले नाही तर याचे अवशेष नष्ट होतील.

# लोहगाव-निरगुडी रस्त्याच्या कामात घोटाळ्याची शक्यता?

### पालिकेचे अधिकारी जोमात, गावकरी गेले कोमात ; पालिका अधिकाऱ्यांची तू तू तू....मै मै मै ची भूमिका

**पुणे : हॅलो प्रभात**
सोमनाथ साळुंके



लोहगाव-निरगुडी मार्गावर पालिकेच्या वतीने जलवाहिनीसह ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण होऊन तीन ते चार महिन्याचा कालावधी उलटून देखील संबंधित रस्त्याचे दुरुस्तीचे काम अद्याप ही पूर्ण करण्यास पालिका अधिकारी असमर्थ ठरल्यामुळे संबंधित कामात लाखो रुपयांचा घोटाळा झाल्याची शंका लोहगावकराकडून उपस्थित होत आहे. अधिकारी जोमात, तर गावकरी गेले कोमात असे म्हणण्याची वेळ आली आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीमध्ये समावेश असलेल्या लोहगावचा सात ते आठ वर्षांपूर्वी पालिकेत समावेश करण्यात आल्याने येथील गावकऱ्यांनी समाधान व्यक्त करून गावचा भविष्यात तरी विकास होईल हे स्वप्न बाळगून असताना आज ही परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह,रस्ते,ड्रेनेज लाइन आदी मुख्य समस्येला सामोरे जाण्याची वेळ आल्याने येथील स्थानिक नागरिकांनी पाहिलेल्या स्वप्नाचा भंग होऊन चुराडा झाल्याचे दिसून येत आहे.

मात्र गेल्या तीन ते चार महिन्यापूर्वी पालिका अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्येची दखल घेत लोहगाव_निरगुडी मार्गावर असलेल्या खंडोबा माळ व इतर वस्त्यांवर जलवाहिनी व ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर घेण्यात आले. याकरिता पालिकेकडून या कामासाठी परवानगी घेऊन संबंधित रस्त्यावर खोदकाम करून जलवाहिनी व ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण करण्यात आले. मात्र सध्या संबंधित रस्ता सुरळीतपणे सुरू करण्यात आला असला तरी पण या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात पालिकेच्या अधिकाऱ्यांना अपयश आले आहे.

त्यामुळे संबंधित रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून त्यातील असलेली खडी रस्त्यावर आल्याने व रात्रीच्या सुमारास पालिकेच्या वतीने बसविण्यात आल्याने पथदिवे बंद अवस्थेत असल्यामुळे उखडलेल्या खडीचा व खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने रस्ते खड्ड्यात की, खड्डे रस्त्यात ही परिस्थिती रस्त्याची होऊन रात्रीच्या सुमारास अनेक दुचाकीस्वार घसरून गंभीर जखमी होण्याची वेळ आली आहे. मात्र संबंधित रस्त्याची दुरुस्ती करण्याऐवजी पालिकेच्या अधिकाऱ्यांनी जनतेच्या मुख्य समस्येकडे पाठ फिरवून कानाडोळा केल्यामुळे पालिका अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर येऊन या कामात लाखो रुपयांचा घोटाळा झाल्याची शंका नागरिकांकडून उपस्थित होत आहे.तर अर्धवट काम सोडून येथे रस्त्याचे काम करणारा ठेकेदारच रस्त्याचे अर्धवट काम सोडून गेल्याने पालिकेचे अधिकारी व ठेकेदार यांच्यात अर्थपूर्ण चर्चा होऊन हे काम थांबण्यात आले आहे का? या समस्येने लोहगावकरांना ग्रासले आहे. तर चक्क ड्रेनेज लाईन विभागाचे अधिकारी सिद्धराम पाटील यांनी या रस्त्याचे काम पूर्ण केल्याचा दावा केला असला तरी पण दोन ते तीन महिन्यात संबंधित रस्ता कसा काय?ना दुरुस्त झाला.याचेच कोडे आता स्थानिक नागरिकांना पडला आहे. विशेष करून जनतेला विकासाच्या माध्यमातून सेवा देणारे पालिकेचे अधिकारी हे उडवाउडवीची उत्तरे देऊन ते करत असलेले कार्य हवेत विरून ते सर्वसामान्य जनतेच्या जीवाशी खेळत आहे. तर पालिकेच्या अधिकाऱ्यांना यासंदर्भात विचारणा केल्यावर अधिकारीच तू तू.... मै मै मै ची भूमिका घेत आहे. त्यामुळे त्यांच्या कामकाजाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अधिकारी खरोखरच जनतेचे प्रश्न सोडवण्यास सक्षम आहेत का? हा सवाल उपस्थित होत असून जनतेच्या मुख्य रस्त्याच्या समस्येला केराची टोपली दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांनी रस्त्याचा झालेला चुराडा पाहून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी लोहगावकराकडून होत आहे.

**या मार्गावर पालिका पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईन विभागाचे काम पूर्ण झाल्यावर पुन्हा रस्ता दुरुस्त करण्यात यावा.यासाठी दोन्ही विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे.र**
**- पौर्णिमा गायकवाड, पालिका पथ विभाग अधिकारी**

**सदरील ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाल्यावर या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे.**
**-सिद्धराम पाटील,पालिका ड्रेनेज विभाग अधिकारी**

**संबंधित ड्रेनेज लाईन विभागातील अधिकाऱ्यांनी केलेला दावा खोटा असून पुढील आठवड्यात ठेकेदारास बरोबर घेऊन रस्ता पुन्हा दुरुस्त करण्यात येईल.**
**- शुभम घाटकर,पालिका पाणीपुरवठा विभाग**

**संबंधित रस्ता दुरुस्तीचे काम पूर्ण न करणाऱ्या व या कामात दोषी आढळणाऱ्या पालिका आयुक्तांच्या वतीने योग्य कारवाई न झाल्यास होणाऱ्या मानवी हक्क उल्लंघन प्रकरणी नागरिकांना होत असलेल्या त्रासाब्बाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**
**-विकास कुचेकर,अध्यक्ष,मानवी हक्क संरक्षण व जागृती**

## थोडक्यात पण महत्वाचे




### संगमेश्वरात छ. संभाजी महाराजांना पोलीस दलाची मानवंदना

**रत्नागिरी : हॅलो प्रभात**

छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त संगमेश्वर-कसबा येथे रत्नागिरी पोलीस दलाच्या बँड पथकाद्वारे छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकास शासकीय मानवंदना देण्यात आली. जिल्ह्यात प्रथमच पोलीस दलाकडून अशा प्रकारे मानवंदना देण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या सोहळ्यात नितीन बगाटे यांच्या हस्ते महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पोलीस बँड पथकाने शिस्तबद्ध पद्धतीने मानवंदना सादर केली. छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य रक्षणाच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सुस्मिता व मनस्वीच्या यशाने विट्याची मान उंचावली

**विटा : हॅलो प्रभात**




■ राज्यस्तरीय परीक्षेत विजयमाला कदम विद्यालयाचा गौरव

भारती विद्यापीठ पुणे आयोजित राज्यस्तरीय परीक्षा व स्पर्धा परीक्षांमध्ये सौ. विजयमाला पतंगराव कदम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, विटा येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. भारती विद्यापीठातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या गणित / इंग्रजी बहिःस्थ परीक्षेत इयत्ता सहावीतील सुस्मिता सचिन क्षीरसागर हिने गणित प्रथमा परीक्षेत राज्यात तृतीय क्रमांक मिळवून उत्कृष्ट यश संपादन केले. तसेच डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धा परीक्षेत इयत्ता चौथीतील कु. मनस्वी तात्यासो शेंडगे हिने राज्यात तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाचा गौरव वाढविला आहे. या दोन्ही विद्यार्थिनींच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक रघुराज मेटकरी, अध्यक्ष रेखा शेंडगे, प्राचार्या वैशाली कोळेकर ,कार्यवाह योगेश्वर मेटकरी शिक्षकवृंद व पालकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणाऱ्या चंदना तामखडे, जयश्री हंबीरे, स्वप्राली पवार या शिक्षकांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेमुळे विद्यार्थ्यांना राज्यस्तरावर यश मिळत असून, या यशामुळे परिसरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### भारती एअरटेलची मजबूत कामगिरी

**पुणे : हॅलो प्रभात**

भारती एअरटेल लिमिटेडने मार्च 2026 अखेरच्या चौथ्या तिमाहीत मजबूत आर्थिक कामगिरी नोंदवली. कंपनीचा एकत्रित महसूल 55,383 कोटी रुपये झाला असून त्यात वार्षिक 15.7 टक्के वाढ झाली आहे. भारतातील मोबाईल व्यवसायात चांगली वाढ झाली असून एआरपीयू 257 रुपयांपर्यंत पोहोचला आहे. याशिवाय, कंपनीने या तिमाहीत 2,426 नवीन टॉवर्स आणि 16,746 मोबाईल ब्रॉडबँड बेस स्टेशन उभारले. तसेच एअरटेलने 65 कोटी ग्राहकांचा टप्पा पार करत जगातील दुसऱ्या क्रमांकाची टेलिकॉम कंपनी म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.



## शिवाजी विद्यापीठात छ. संभाजी महाराज जयंती साजरी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठात आज छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचा हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँण्ड टेक्नालॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे, डॉ. उमाकांत हत्तीकट, उपकुलसचिव डॉ. गजानन पळसे, सुरेश बंडगर, डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते.

## पुणे जिल्ह्यातील झेडपी शाळांना मिळणार 'शिपाई मामा'

### ग्रामपंचायतींना भरतीचे अधिकार

**पुरंदर : हॅलो प्रभात**




पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या शिपाई पदांचा प्रश्न आता स्थानिक पातळीवर मार्गी लागणार आहे. शाळांमधील स्वच्छता, शिस्त आणि दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी ग्रामपंचायतींना शिपाई नेमण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. यासंदर्भात गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद यांनी ८ मे २०२६ रोजी सर्व पंचायत समित्यांना महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले आहेत. शिक्षण विभागाच्या अहवालानुसार, अनेक शाळांमध्ये शिपाई नसल्याने स्वच्छता, परिसर देखभाल आणि शालेय कामकाजावर परिणाम होत होता. ही अडचण दूर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ६१ अंतर्गत ग्रामपंचायतींना आपल्या कार्यक्षेत्रातील शाळांसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा मार्ग खुला करण्यात आला आहे. नियुक्ती प्रक्रियेसाठी काही प्रशासकीय निकषही निश्चित करण्यात आले आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या आणि प्रत्यक्ष गरज लक्षात घेऊनच नियुक्ती करावी, ग्रामपंचायतीच्या आर्थिक क्षमतेचा विचार करावा तसेच शिक्षण विभागाशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहणार आहे. शासन नियमांचे पालन करूनच ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या निर्णयामुळे स्थानिक सुशिक्षित तरुणांना गावातच रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून, शाळांच्या व्यवस्थापनात ग्रामपंचायतींचा सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. शाळांची स्वच्छता व सुविधा सुधारण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## काळ्या फिल्मच्या गाड्यांचा सुळसुळाट ?

■ सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर
■ फन्सी नंबर प्लेट व काळ्या काचांच्या वाहनांवर कारवाईची मागणी

**वाघोली : हॅलो प्रभात**



वाघोली व परिसरात गडद काळी फिल्म लावलेल्या चारचाकी वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून यामुळे सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही अनेक वाहने काळ्या काचा व फन्सी नंबर प्लेटसह बिनधास्तपणे रस्त्यावर धावत असल्याने पोलीस व परिवहन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नागरिकांकडून संबंधित विभागांनी तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दुचाकीस्वारांनी हेल्मेट न घातल्यास वाहतूक पोलिसांकडून कठोर कारवाई केली जाते. मात्र काळी फिल्म लावलेल्या वाहनांवर मात्र कारवाई होत नसल्याने दुहेरी निकष लावले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. नवीन वाहन खरेदी केल्यानंतर काही वाहनचालक नियम धाब्यावर बसवत गडद काळी फिल्म लावत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर अशा वाहनांमधून नेमके कोण प्रवास करत आहे, याचा अंदाज घेणे कठीण होत असल्याने सुरक्षेचा धोका वाढत आहे. काही वाहनांमध्ये काळ्या काचांचा वापर करून अवैध कृत्ये होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. विशेष म्हणजे अनेक राजकीय कार्यकर्ते, धनदांडगे, उद्योजक व तथाकथित पुढारी अशा नियमबाह्य वाहनांचा वापर करत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी कारवाई करण्यास धजावत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, कार डेकोरेशनच्या दुकानांमध्ये काळी फिल्म बसविण्याचा व्यवसाय खुलेआम सुरू असून न्यायालयाच्या आदेशानंतर काही दिवस कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यानंतर परिस्थिती पूर्ववत झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वाहन नियमांची अंमलबजावणी केवळ सर्वसामान्यांसाठीच आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

**नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर सातत्याने कारवाई सुरू आहे. फन्सी नंबर प्लेट व काळ्या काचा असणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई केली जाईल.**
**- राहुल कोळंबीबीकर (सहा.पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, वाघोली)**

**काळ्या काचा आणि फन्सी नंबर प्लेटमुळे गुन्हेगारांना संरक्षण मिळण्याची शक्यता वाढते. नियम केवळ सर्वसामान्य नागरिक आणि प्रभावशाली लोकांसाठी वेगळे असू शकत नाहीत. पोलीस व परिवहन विभागाने संयुक्त मोहीम राबवून अशा वाहनांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.**
**-ॲड. गणेश म्हस्के पाटील,समन्वयक, शिवसेना, पुणे जिल्हा**

## टवाळखोर युवकांवर पोलिसांची कडक कारवाई

### बारामतीत वाहतूक शाखेचा धडाका

**बारामती शहर : हॅलो प्रभात**



बारामती शहरातील कारभारी चौक, कसबा परिसर तसेच विविध चौकांमध्ये वाहतूक शाखेकडून विशेष वाहतूक कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. कॉलेजमधील काही युवक दुचाकींवर नियमबाह्य नंबर प्लेट वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे. एक नंबर मोठा व दुसरा नंबर लहान अशा प्रकारे नंबर प्लेटमध्ये बदल करून वाहने चालविण्यात येत आहेत. तसेच अनेक युवक दुचाकींवर ट्रिपल सीट, चौबल सीट प्रवास करून भरधाव व वाकड्यातिकड्या पद्धतीने वाहन चालवत दंगा करत असल्याचे आढळून आले आहे. वाहतूक शाखेच्या निदर्शनास आल्यानंतर संबंधित वाहनांना थांबविण्याचा प्रयत्न केल्यास काही वाहनचालक पळून जाण्याचाही प्रयत्न करीत आहेत. या पार्श्वभूमीवर बारामती शहरातील प्रत्येक प्रमुख चौकामध्ये पोलीस बंदोबस्त ठेवून अशा टवाळखोर युवकांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. ही मोहीम पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. पालकांनी आपल्या मुलांकडे विशेष लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये. अन्यथा संबंधित पालकांवरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वाहतूक नियमांचे पालन करून नागरिकांनी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक शाखा, बारामती शहर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नातेपुते-बारामती एसटी बसेस वेळेवर सोडावी

### संकल्प बहुउद्देशीय संस्थेची निवेदनाने मागणी

**नातेपुते : हॅलो प्रभात**



नातेपुते ते बारामती मार्गावरील एसटी बसेस वेळेवर सुटत नसल्यामुळे प्रवासी, विद्यार्थी, कामगार व नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सोलापूर जि.प. समाज कल्याण सभापती संस्कृती ताई सातपुते यांना दि.१३ मे रोजी दहिगाव येथील जनता दरबारात निवेदन देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की नातेपुते-बारामती मार्गावरील एसटी बसेस सकाळी ११:१५ नंतर एकही बसेस वेळेवर सोडली जात नाही एसटी बसेस वेळेवर सुटत नसल्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे अनेक वेळा बसेस ठरलेल्या वेळेपेक्षा उशिरा सुटतात त्यामुळे विद्यार्थी कर्मचारी शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन कामकाज विस्कळीत होत आहे विशेषता नातेपुते दहिगाव बारामती मार्गावरील एसटी बसेस सकाळी सव्वाअकरा नंतर एकही एसटी बसेस वेळेवर सोडली जात नाही याबाबत प्रवाशांनी व सामाजिक व राजकीय कार्यकर्ते व पुढारी यांनी अनेक वेळा अकलूज आगारात तक्रार करून सुद्धा संबंधित मार्गावर वेळेवर बसेस सोडल्या जात नाहीत तरी जनतेच्या सोयीसाठी सदर बसेस वेळेवर सोडण्यासाठी संबंधित विभागास आपले आदेश व्हावेत अशी मागणी करण्यात आली यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सकाळी सव्वा अकरानंतर बसेस उशिरा सुटत असल्याने नागरिकांना वेळेवर गंतव्यस्थानी पोहोचणे कठीण होत असून अनेकदा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

## शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा प्रयत्न : मंत्री हसन मुश्रीफ

कागल : हॅलो प्रभात



कागल-गडहिंग्लज-उत्तूर मतदारसंघातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न सुरू असल्याची ग्वाही वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. बामणी (ता. कागल) येथे सिद्धनेर्ली उपकेंद्रांतर्गत उभारण्यात आलेल्या ३ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री सौर ऊर्जा कृषी वाहिनी योजनेअंतर्गत उपलब्ध जागेवर सौर प्रकल्प उभारण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री मुश्रीफ यांनी मतदारसंघात चार ठिकाणी सौर प्रकल्पांची कामे सुरू असल्याचे सांगत कागल शहरात भाडेतत्त्वावर जागा घेऊनही प्रकल्प उभारण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केले. ज्या ठिकाणी जागेची अडचण आहे, तेथे तहसीलदारांमार्फत पाहणी करून अहवाल मागवण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात माजी आमदार संजयबाबा घाटगे यांनी सौर ऊर्जा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे सांगितले. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते. ग्रामस्थांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत मंत्री मुश्रीफ यांनी स्थानिक मागण्या तातडीने मान्य करण्याचे आश्वासन दिले.

## एमआरडीपी अंतर्गत ४१९ कोटींच्या प्रकल्पास मान्यता

इचलकरंजी : हॅलो प्रभात

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (एमआरडीपी) अंतर्गत इचलकरंजी शहरातील पूरस्थिती नियंत्रण व आधुनिक ड्रेनेज व्यवस्था उभारण्यासाठी सादर करण्यात आलेल्या ४१९ कोटी रुपयांच्या प्रकल्प प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक समितीने बुधवारी मान्यता दिली आहे. या मान्यतेमुळे शहरातील पावसाळी पाणी निचरा व्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे राहुल आवाडे यांनी ही माहिती दिली. शहरातील वारंवार उद्भवणाऱ्या पूरस्थितीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पंचगंगा नदीची पाणीपातळी वाढल्यानंतर नागरी वस्त्यांमध्ये महापुराचे पाणी शिरून रस्ते, गटारी व सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान होत होते. या पार्श्वभूमीवर इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरातील पूरस्थिती नियंत्रण, स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज व्यवस्था विकसित करणे आणि पावसाळ्यातील पाण्याचा निचरा सुरळीत करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता.



या प्रकल्पात 'नेचर बेस सोल्युशन' संकल्पनेवर विशेष भर देण्यात आला आहे. त्याअंतर्गत काळा ओढा व चंदूर ओढा यांचे रुंदीकरण, गाळ काढणे, पाइप कल्व्हर्टऐवजी बॉक्स कल्व्हर्ट उभारणे, रस्त्याकडील ड्रेनेज व्यवस्था विकसित करणे, शहापूर खण विकास, रेनवॉटर हार्वेस्टिंग, डिटेन्शन पॉन्ड, कॉन्टूर ट्रेंचेस तसेच मियावाकी गार्डनसारख्या पर्यावरणपूरक उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर प्रकल्पाचा अहवाल जागतिक बँक आणि 'मित्रा' संस्थेच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला असून विविध टप्प्यांवरील अहवालांना यापूर्वीच मंजुरी देण्यात आली होती. पर्यावरण व सामाजिक परिणामांचा अभ्यास करण्यासाठी विशेष पथकाने शहराची पाहणी करून नागरिकांचे अभिप्रायही नोंदवले होते. या प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक तज्ज्ञांची नियुक्ती प्रक्रिया पूर्ण झाली असून राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेनंतर प्रत्यक्ष कामांना वेग मिळणार आहे. भविष्यात शहरातील पाणी साचणे, पूरस्थिती, नाल्यांच्या समस्या आणि पावसाळ्यातील नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार असल्याचे आमदार राहुल आवाडे यांनी सांगितले. आधुनिक ड्रेनेज व्यवस्था आणि पर्यावरणपूरक विकासकामांमुळे इचलकरंजी शहराच्या शाश्वत विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## डांगे शैक्षणिक संकुलात नूतन जलतरण तलावाचे लोकार्पण



आष्टा : हॅलो प्रभात

संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या आष्टा येथील डॉ. अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुलात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक जलतरण तलावाचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे तंत्र व उच्च शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी संकुलाला सदिच्छा भेट देत संस्थेच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील विविध उपक्रमांची माहिती घेतली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी संस्थेने उचललेले पाऊल कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

सुभद्रा इंटरनॅशनल स्कूलच्या चौथ्या मजल्यावर उभारण्यात आलेला हा जलतरण तलाव २५ मीटर लांब, १५ मीटर रुंद व साडेचार फूट खोलीचा असून त्यामध्ये सहा ट्रॅकची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. पुरुष व महिला विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सुविधा तसेच महिला प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून सर्व आधुनिक सोयी-सुविधांनी हा तलाव सुसज्ज करण्यात आला आहे. कार्यक्रमात महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री तथा संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णासाहेब डांगे यांच्या हस्ते मंत्री चंद्रकांत पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी भारतीय जनता पार्टी सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक राहुल महाडिक, मकरंद देशपांडे आदी मान्यवरांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव ॲड. राजेंद्र उर्फ चिमण डांगे, सहसचिव विश्वनाथ डांगे, संचालक छगनराव नांगरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गटाचे प्रवीण माने, प्रसिद्ध धन्वंतरी डॉ. सतीश बापट, वाळवा तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तसेच संस्थेच्या विविध शाखांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक, कर्मचारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही

मुंबई : हॅलो प्रभात

राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यांपेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली. ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे.

राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे. राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २०१९ साली छतावरील सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या वीजग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करण्याचा निर्णय दिला होता. त्यावेळी आयोगाने छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पांची राज्यातील एकूण क्षमता २ हजार मेगावॅट झाल्यावर हा चार्ज लागू करण्याचा आदेश दिला होता. आयोगाने २०२३ मध्ये ही मर्यादा ५ हजार मेगावॅट केली. या वर्षाच्या सुरुवातीला राज्याने ५ हजार मेगावॅटची क्षमता ओलांडल्यानंतर आयोगाने २५ मार्च २०२६ च्या वीजदर आदेशात ग्रीड सपोर्ट चार्ज निश्चित केला.

## गोरडवाडीत रक्तदान व मोफत नेत्रतपासणी शिबिर

पिलीव : हॅलो प्रभात

माळशिरस तालुक्यातील गोरडवाडी येथे धनगर समाजाचे नेते स्व. नानासाहेब कर्णवर पाटील यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त गुरुवार, दि. १४ मे रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सद्गुरू श्री श्री साखर कारखाना लि. श्री श्रीनगर (राजेवाडी) चे व्हा.चेअरमन डॉ. बाळासाहेब कर्णवर-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कमल फाउंडेशन व समस्त ग्रामस्थ गोरडवाडी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यावेळी झी टॉकीज 'मन मंदिरा' फेम ह.भ.प. ज्ञानेश्वरीताई घाडगे टाकळीकर यांची कीर्तनसेवा आयोजित करण्यात आली असून, "दानात श्रेष्ठ दान म्हणजे रक्तदान" या संकल्पनेतून रक्तदान शिबिर तसेच मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कर्णवर-पाटील परिवाराकडून दरवर्षी विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविले जातात. यंदाही नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बिंदू चौकात ६ जून रोजी 'शिवाजी कोण होता?' चे सामूहिक वाचन

कोल्हापूर : हॅलो प्रभात

शिवराज्याभिषेक दिनी ६ जून रोजी कोल्हापूर येथील बिंदू चौकात कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तिकेचे विविध जाती-धर्मातील हजारो नागरिकांच्या उपस्थितीत सामूहिक वाचन करण्याचा ठराव कोल्हापुरात झालेल्या पहिल्या कॉम्रेड गोविंद पानसरे विचार संमेलनात एकमताने मंजूर करण्यात आला.

मानवतावादी सांस्कृतिक चळवळ आणि सत्यशोधक इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू स्मारक भवन येथे हे संमेलन पार पडले. संमेलनाचे उद्घाटन डॉ. भारत पाटणकर यांच्या हस्ते संविधानाच्या प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात आले.



या संमेलनात विविध ठराव मंजूर करण्यात आले. त्यामध्ये छत्रपती शिवरायांच्या इतिहासावर वेगवेगळ्या पद्धतीने मांडणी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर इतिहासाच्या पुनर्विचाराची गरज अधोरेखित करण्यात आली. तसेच शिवचरित्राच्या लोककल्याणकारी विचारांचा प्रसार जातीपातीच्या पलीकडे जाऊन करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी डॉ. भारत पाटणकर यांनी समाजात शिवचरित्राचे सोयीस्कर अर्थ लावले जात असल्याची टीका करत मूळ इतिहास समजून घेण्याची गरज व्यक्त केली. तर संमेलनाध्यक्ष डॉ. कपिल राजहंस यांनी खोट्या इतिहासाच्या मांडणीऐवजी सत्यशोधनावर आधारित इतिहास समाजापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.

दरम्यान, संमेलनात 'कॉम्रेड गोविंद पानसरे अध्यासन केंद्र' स्थापन करणे, तसेच त्यांच्या जीवनावर आधारित चित्रपट लोकसहभागातून तयार करण्याचा संकल्पही करण्यात आला. कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध भागांतून लेखक, विचारवंत, कार्यकर्ते व साहित्यिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धर्मवीर संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर

कुर्डूवाडी : हॅलो प्रभात



माढा तालुक्यातील बारलोणी येथील महापुरुष जयंती पुण्यतिथी उत्सव समितीच्यावतीने धर्मवीर संभाजी महाराज यांची ३६९वी जयंती साजरी करण्यात आली.

याच जयंती उत्सवाच्या निमित्ताने बार्शी येथील कॅन्सरतज्ञ डॉ. राहुल मांजरे यांच्या साईसंजीवनी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सदर शिबिरामध्ये ८५ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. यामध्ये महिलांचे आजार, मणक्याचे विकार गुडघेदुखी पाठ दुखी मुतखडा इत्यादी व्याधींवर तपासणी व मोफत औषध उपचार तसेच सल्ला देण्यात आला. या शिबिरामध्ये साई संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ.विजय खुणे, सचिन मांजरे, संकेत ठोंगे, महेश जाधव, चांदणी मॅडम, निषाद पठाण यांनी रुग्णांची तपासणी करून मोफत औषध उपचार देण्यात आले. सोलापूर जिल्ह्यातून उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून बारलोणी येथील अनिल हनवते यांचा जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे जिल्हाधिकारी कार्तिकेन यांच्या शुभहस्ते नुकताच गौरव करण्यात आला त्याबद्दल त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी रामेश्वर लोंढे, ह. भ.प. नानासाहेब पाटील महाराज, सुरेश बागल,व्यंकटेश पाटील, छगन गुंजाळ, सदाशिव शेलार,बिजू चव्हाण आजिनाथ हनवते, जयवंत मोरे,साधू आतकर,दिगंबर कैचे,तसेच उत्सव समितीचे सचिव अनिल ठोंबरे सहसचिव ह. भ. प. राजेंद्र राऊत, अध्यक्ष पत्रकार प्रकाश आतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## स्वगणना १०० टक्के पूर्ण करणारे 'दळवटणे' जिल्ह्यात पहिले गाव

रत्नागिरी : हॅलो प्रभात

भारताच्या जनगणना २०२७ मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्वगणना उपक्रमात चिपळूण तालुक्यातील दळवटणे गावाने उल्लेखनीय कामगिरी करत रत्नागिरी जिल्ह्यात पहिले स्थान मिळविले आहे. गावातील सर्व ४२५ कुटुंबांची स्वगणना प्रक्रिया शंभर टक्के पूर्ण करण्यात आली आहे.

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरयादी व घरगणनेच्या पूर्वतयारीसाठी १ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वगणना मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात मोहिमेचे नियोजन करण्यात आले असून, पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी १ मे रोजी स्वगणना करून मोहिमेचा प्रारंभ केला होता.

उपविभागीय अधिकारी आकाश लिगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली दळवटणे गावाची या विशेष उपक्रमासाठी निवड करण्यात आली होती. गावातील सर्व ९ वाड्यांमधील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत निर्धारित मुदतीत नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली. २०११ च्या जनगणनेनुसार दळवटणे गावाची लोकसंख्या १ हजार ८७१ इतकी होती. नव्या स्वगणनेनुसार गावाची अंदाजे लोकसंख्या २ हजार २६२ इतकी झाली असून, गावात एकूण ४२५ कुटुंबांची नोंद झाली आहे.



या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तहसीलदार प्रवीण लोकरे, मंडळ अधिकारी नारायण चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रगणक वैशाली पेड्डेवाड, सचिन जाधव, प्रिया मोरे यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय काम पार पाडले. मदतनीस म्हणून शीतल कराडकर, रोशनी जाधव, ऋतुजा इंगवले, मेघना नलावडे, सुप्रिया बोबले, अर्चना जाधव, सीमा गमरे, सुवर्णा जाधव तसेच पोलीस पाटील अमित मोहिते यांनी विशेष योगदान दिले. एकूण ४२५ कुटुंबांची स्वगणना प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दळवटणे गावाने दाखविलेल्या तत्परतेचे जिल्हा प्रशासनाकडून कौतुक करण्यात येत असून, आगामी जनगणनेसाठी हे गाव आदर्श ठरत असल्याचे प्रशासनाने नमूद केले.

**वाड्यांनुसार स्वगणनेची स्थिती**

| | |
|---|---|
| शेट्येवाडी | १८ कुटुंबे |
| गणेशवाडी | ५१ |
| बागवाडी | ६७ |
| रामवाडी | १८ |
| भुवडवाडी | ६४ |
| नलावडेवाडी | १०१ |
| बडदेवाडी | ३५ |
| राजवाडा | २२ |
| बौद्धवाडी | ४९ |

## अवकाळी पावसाचा तडाखा; विजेने १८ मेंढ्यांचा मृत्यू

सातारा : हॅलो प्रभात

सातारा जिल्ह्यात बुधवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसाने जनजीवन विस्कळीत केले. वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले असून नागरिकांची तारांबळ उडाली. सातारा तालुक्यातील कोंडवे गावात विजेचा तडाखा बसून १८ मेंढ्यांचा मृत्यू झाला. मेंढपाळ हनुमंत मासाळ यांच्या मेंढ्यांवर अचानक वीज कोसळल्याने ही घटना घडली. सुदैवाने, काही वेळापूर्वीच ते दुसरीकडे गेल्याने त्यांचा जीव वाचला. घटनेनंतर पंचनामा करण्यात आला असून शासनाने मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, जोरदार वाऱ्यामुळे क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालय परिसरात दोन मोठी झाडे कोसळली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राहुल जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. जिल्ह्याच्या पश्चिम भागातही मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले होते. ग्वाल्हेरबेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीवरही परिणाम झाला. अवकाळी पावसामुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये चिंता व्यक्त होत असून नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्याची मागणी होत आहे.

## १५ वर्षाखालील महिला क्रिकेट निवड चाचणी संपन्न



सांगली : हॅलो प्रभात

सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने १५ वर्षाखालील महिला क्रिकेट संघ निवडीसाठी आयोजित निवड चाचणी उत्साहात पार पडली.

या निवड चाचणीत एकूण ४० मुलींनी सहभाग नोंदवला. खेळाडूंच्या कौशल्य, फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण यांचे मूल्यमापन करून संघ निवडीची प्रक्रिया पार पडली. निवड समिती म्हणून धनंजय डुबल आणि आमशीद गुंडल यांनी काम पाहिले.

या निवड चाचणीचे उद्घाटन विष्णू शिंदे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी चेतन सर, अक्षय पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू व पालक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे माजी खजिनदार तसेच जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष संजय बजाज आणि महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे स्पर्धा समिती सदस्य निलेश शहा यांनी सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. सदर निवड चाचणीमुळे जिल्ह्यातील महिला क्रिकेटला प्रोत्साहन मिळणार असून गुणवत्ताधारक खेळाडूंना पुढील स्पर्धांसाठी संधी उपलब्ध होणार आहे, असे आयोजकांनी सांगितले.

## राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न

विटा : हॅलो प्रभात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ आणि आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटर, विटा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर कळंबी येथे उत्साहात पार पडले. दि. ५ ते ११ मे दरम्यान आयोजित या शिबिराचा समारोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रताप मेटकरी होते.

अध्यक्षीय भाषणात प्रताप मेटकरी यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक करताना राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी शाळा असल्याचे सांगितले. ग्रामीण भागात जाऊन तांत्रिक ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करणे ही स्तुत्य बाब असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व नेतृत्वगुण विकसित होतात, असे त्यांनी नमूद केले. या शिबिरात राष्ट्रीय सेवा




योजनेतील ५० स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेत विविध सामाजिक व तांत्रिक उपक्रम राबवले. सौर ऊर्जा जागरूकता, विद्युत सुरक्षा, संगणक व कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता अभियान, इमारतींची तांत्रिक तपासणी तसेच ऊर्जा कार्यक्षम घर निर्मिती यांसारख्या विषयांवर प्रात्यक्षिके घेण्यात आली. ग्रामस्थांनी या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास कळंबी गावच्या सरपंच सुनंदा इंगळे, सर्व सेवा सोसायटीचे अध्यक्ष राहुल पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व मान्यवर उपस्थित होते. शिबिराचे नियोजन प्रा. प्रदीप शिंदे व समन्वयक सचिन शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन एकनाथ पवार यांनी केले.

## 'दादासाहेब आडमुठे' विद्यालय दहावीचा १०० टक्के निकाल

दुधगाव : हॅलो प्रभात

रयत शिक्षण संस्था, सातारा संचलित दादासाहेब आडमुठे (लंगडे) कन्या विद्यालय, दुधगाव येथील मार्च २०२६ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयातून एकूण २८ विद्यार्थिनी परीक्षेस प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी सर्व विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून १२ विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य, १० विद्यार्थिनींनी प्रथम श्रेणी, ५ विद्यार्थिनींनी द्वितीय श्रेणी तर १ विद्यार्थिनीने पास श्रेणी मिळवली आहे.

विद्यालयातील कु. पाटील विभावरी विक्रमसिंह हिने ९७.६० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम तसेच कवठे पिरान केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. कु. वाडकर संजिवता सुधीर हिने ९०.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, तर कु. देसाई अक्षरा अनिल हिने ८७.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच माने श्रावणी शरद हिने ८७.०० टक्के गुण मिळवून चौथा क्रमांक, परमाज पत्री आरती अण्णासो हिने ६८.२० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक, तर कोळी श्रावणी इंद्रजित हिने ६८.०० टक्के गुण मिळवून सहावा क्रमांक प्राप्त केला. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे शाळा समिती, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ, मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कामकाजाला मिळणार गती

मुंबई : हॅलो प्रभात

■ सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकाराने नवीन नियमावलीला मंजुरी

राज्यातील लाखो सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रशासकीय आणि कायदेशीर कामकाजासाठी अत्यंत महत्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा केल्यानंतर गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या स्वतंत्र नियमावलीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकाराने अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे गृहनिर्माण संस्थांचा कारभार अधिक पारदर्शक, सुलभ आणि गतिमान होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने २०१९ मध्ये सहकारी संस्था कायद्यात सुधारणा करून गृहनिर्माण संस्थांसाठी एका स्वतंत्र प्रकरणाचा समावेश केला होता. कायद्यात ही ऐतिहासिक सुधारणा झाल्यानंतर त्या अनुषंगाने सविस्तर नियम तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित होती. गृहनिर्माण संस्थांचे प्रश्न आणि त्यांच्या कामकाजात येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी पदभार स्वीकारल्यापासून या प्रक्रियेला गती देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या सकारात्मक पुढाकारामुळेच अखेर या प्रलंबित नियमावलीवर शिक्कामोर्तब झाले असून, यामुळे गृहनिर्माण क्षेत्रातील प्रशासकीय अडथळे आता दूर होणार आहेत. या नवीन नियमावलीमुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या दैनंदिन कामकाजात स्पष्टता येणार आहे. विशेषतः निवडणुका, सभासदांचे हक्क, हस्तांतरण शुल्क आणि संस्थांचे व्यवस्थापन यासारख्या विषयांवर यापूर्वी अनेकदा संभ्रमावस्था निर्माण होत असे. मात्र, आता स्वतंत्र नियम अस्तित्वात आल्यामुळे संस्थांच्या व्यवस्थापन समितीला निर्णय घेणे सोपे होणार असून सामान्य सभासदांनाही आपल्या हक्कांची आणि जबाबदाऱ्यांची जाणीव होईल. या निर्णयामुळे गृहनिर्माण संस्थांमधील वाद कमी होण्यास मदत होईल आणि एकंदर सहकारी चळवळ अधिक बळकट होईल, असा विश्वासही सहकार मंत्री पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### सिडकोतर्फे महत्त्वपूर्ण व्यापार केंद्र प्रस्तावित : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : हॅलो प्रभात




आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र विकसित करण्याकरिता सिडको आणि आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाउंडेशन (एआयईएफ) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत आफ्रिका भारत करारावर स्वाक्षऱ्या करून आदान-प्रदान करण्यात आले. मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या बैठकीस नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, आफ्रिका इंडिया ईकॉनॉमिक फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. जी. रथिनवेलू, संयुक्त राष्ट्रसंघ राजदूत न्यूयॉर्कचे राजदूत टी. एस. तिरुमूर्ती, यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सिडकोतर्फे आफ्रिका भारत व्यापार केंद्र (एआयबीसी) नवी मुंबई येथे प्रस्तावित असून भारत व आफ्रिकन राष्ट्रांमधील आर्थिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे एकात्मिक केंद्र म्हणून हा प्रकल्प संकल्पित आहे. द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक आणि संस्थात्मक भागीदारी यांना चालना देण्याच्या उद्देशाने आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाउंडेशन (एआयईएफ) यांच्या सहयोगाने हा प्रकल्प आकारास येणार आहे. ग्लोबल साउथ देशांमधील सहाकार्याकरिता भारताचे नेतृत्व मान्य होत असताना, भारत-आफ्रिकेतील सध्याच्या 96 अब्ज अमेरिकन डॉलर भागीदारीच्या क्षमता अधिक वाढीस लागाव्या याकरिता हा प्रकल्प महत्त्वाचा आहे.

### विविध सिंचन प्रकल्पांच्या कामांचा आढावा; अनेक प्रकल्पांना गती

मुंबई : हॅलो प्रभात

राज्यातील विविध सिंचन प्रकल्पांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि गोदावरी खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीला आमदार संभाजी पाटील उपस्थित होते तर आमदार अर्जुन खोतकर दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. बैठकीस जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, सहसचिव प्रसाद नार्वेकर, कार्यकारी संचालक जयंत गवळी, कार्यकारी संचालक हनुमंत धुमाळ, मुख्य अभियंता अरुण नाईक, मुख्य अभियंता सुनंदा जगताप, मुख्य अभियंता संजीव चोपडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जालना जिल्ह्यातील हातवण येथील बृहत लघु प्रकल्प तसेच दुधना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे रुपांतर करण्यास मान्यता देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शनिदेवगाव उच्च पातळी बंधारा प्रकल्पामुळे वैजापूर व श्रीरामपूर तालुक्यातील एकूण १६ गावांना सिंचनाचा लाभ होणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी यावेळी सांगितले. या प्रकल्पाचे लाभक्षेत्र १९७८ हेक्टर असून वैजापूर तालुक्यातील देवगाव शनि, गाढे पिंपळगाव, अवलगाव, बाजाठाण, चांदेगाव, भालगाव, हमरापूर, नागमठाण, वांजरगाव तसेच श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर, महाकालवाडगाव, भामाठाण, कमालपूर, घुमनदेव, घांघरगाव आणि डोमेगाव या गावांचा समावेश लाभक्षेत्रात होणार आहे. या प्रकल्पामुळे १९७८ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील मसलगा मध्यम प्रकल्प आणि हाडगा लघुपाटबंधारे प्रकल्पांचे सुधारित प्रस्ताव ३० जूनपूर्वी सादर करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.



# दुसरा 'मुंबई क्लायमेट वीक' फेब्रुवारी २०२७ मध्ये होणार

## 'मुंबई क्लायमेट वीक'च्या निष्पत्ती व परिणामकारकता अहवालाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन

मुंबई : हॅलो प्रभात

हवामान बदलाच्या प्रश्नांवर जागतिक स्तरावरील चर्चा आणि प्रत्यक्ष कृती यांचा संगम घडवून आणणाऱ्या 'मुंबई क्लायमेट वीक'च्या पहिल्या पर्वाच्या परिणाम आणि प्रभाव अहवालाचे ('आउटकम अँड इम्पॅक्ट रिपोर्ट') प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीनंतर करण्यात आले. मुंबई क्लायमेंट वीकच्या दुसऱ्या पर्वाचे आयोजन २२ ते २६ फेब्रुवारी २०२७ दरम्यान मुंबईत करण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थेच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जात असून, मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे यजमान संस्थांमध्ये सहभागी आहेत. अहवाल प्रकाशनाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

**'मुंबई क्लायमेट वीक इनोव्हेशन चॅलेंज'मध्ये ग्लोबल साऊथमधील ३५० हून अधिक अर्जदारांनी सहभाग घेतला. ऊर्जा, पाणी, शेती, कचरा व्यवस्थापन आणि हवामान डेटा या क्षेत्रांतील ३४ अंतिम स्पर्धकांमधून आठ विजेते निवडण्यात आले. या उपक्रमात माजी अमेरिकन परराष्ट्रमंत्री हिलरी क्लिंटन, अंतराळवीर राकेश शर्मा, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले होते.**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य सरकार आणि पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या पूर्ण सहकार्याची ग्वाही दिली. "नागरिकाभिमुख आणि प्रगतीशील हवामान उपाययोजना उभारण्यावर आमचा भर राहील," असे त्यांनी स्पष्ट केले. 'मुंबई क्लायमेट वीक २०२६'चा मुख्य उद्देश हवामान बदलासंदर्भातील चर्चा केवळ परिषदांपुरती मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृती आणि अंमलबजावणीवर भर देणे हा होता. तीन दिवसांच्या या उपक्रमात शहरी लवचिकता, अन्न व्यवस्था आणि ऊर्जा संक्रमण या तीन प्रमुख विषयांवर केंद्रित चर्चा झाली. सरकार, वित्तीय संस्था, उद्योग समूह, संशोधक, नवोन्मेषक, नागरी संस्था, शैक्षणिक संस्था आणि स्थानिक समुदाय अशा विविध स्तरांतील घटक एकाच व्यासपीठावर आले. या उपक्रमात ३० हून अधिक देशांतील चार हजारांपेक्षा अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. एकूण १३५ कार्यक्रमांच्या माध्यमातून सरकार, वित्तीय संस्था, उद्योग, संशोधक, नागरी संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि स्थानिक समुदाय एकत्र आले. या उपक्रमातून सात सामंजस्य करार करण्यात आले, तर दहापेक्षा अधिक धोरणात्मक साधने आणि उपक्रम सुरू करण्यात आले. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम, युनिसेफ, वर्ड रिसोर्स इन्स्टिट्यूट, सी ४० प्लस सिटीज, महिंद्रा कंपनी यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनीही सहभाग नोंदवला. शहरी उष्णता नियंत्रण, महानगर नियोजन, हवामान डेटा, कमी-कार्बन पायाभूत सुविधा आणि हवामान प्रशासन या क्षेत्रांमध्ये राज्याची क्षमता वाढविण्यासाठी या भागीदाऱ्या महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

**प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक शिशिर जोशी यांनी सांगितले की, 'मुंबई क्लायमेट वीक २०२७'मध्ये नागरिकांचा अधिक व्यापक सहभाग, जनजागृती आणि स्थानिक स्तरावरील हवामान कृतीवर भर दिला जाणार आहे. हवामान बदलावर चर्चा करण्यापासून प्रत्यक्ष उपाययोजनांकडे वाटचाल करणे हेच या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**

कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्राच्या 'क्लायमेट फायनान्स ॲक्सेस अँड मोबिलायझेशन स्ट्रॅटेजी'ची घोषणा करण्यात आली. तसेच 'क्लायमेट प्रोजेक्ट प्रिपरेशन फॅसिलिटी' (पीपीएफ) या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत ४४ अमृत शहरांतील एक हजारांहून अधिक हवामान कृती प्रकल्पांची रूपरेषा तयार करण्यात आली.

'मुंबई क्लायमेट वीक २०२६'मध्ये १०० हून अधिक हवामान उपाययोजनांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. उष्णतेशी मुकाबला करणाऱ्या उपाययोजना, सौर ऊर्जा, पुनरुत्पादक शेती, कचऱ्याचे पुनर्वापर तंत्र, शहरी जंगल, कूल रूफ्स, हवामान अर्थसंकल्प यांसारख्या संकल्पनांना विशेष प्रतिसाद मिळाला.

## पूर्णा नदीवरील साखळी बंधाऱ्यांची कामे कालमर्यादेत पूर्ण करावी

मुंबई : हॅलो प्रभात



■ मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

पूर्णा नदीवरील 10 साखळी बंधारे (छत्रपती संभाजीनगर) तसेच भराडी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या पुनर्नियोजन अंतर्गत प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर संबंधित क्षेत्रात सिंचन क्षमता वाढ, होणार असल्याने ही कामे कालमर्यादेत पूर्ण केले जावीत , असे निर्देश जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि गोदावरी खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. विविध सिंचन प्रकल्पातील कामांच्या आढाव्याबाबत मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. याप्रसंगी बैठकीस माजी मंत्री अब्दुल सत्तार, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, सहसचिव प्रसाद नार्वेकर, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी यासह विविध प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या योजनेची अंदाजित किंमत ₹534.92 कोटी इतकी असून 4.79 दलघमी पाणीसाठा व 1422 हेक्टर सिंचन क्षमता प्रस्तावित आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये अजिंठा बंधारा (ता. सिल्लोड), खेळणा मध्यम प्रकल्प (उंचीवाढ प्रस्ताव) तसेच पूर्णा नदीवरील 10 साखळी बंधारे या योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अजिंठा बंधारा (ता. सिल्लोड) या प्रकल्पाची अंदाजपत्रकीय किंमत सुमारे ₹250 कोटी इतकी असून प्रकल्पीय पाणीसाठा 7.00 दलघमी आहे.

## जेजुरीतील 'भंडारा' वापराबाबत सुरक्षिततेचे नियम

*भाविकांच्या आरोग्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा निर्णय*

मुंबई : हॅलो प्रभात



जेजुरी गडकोटातील भक्तांचे श्रद्धास्थान असलेला आणि भंडाऱ्यासाठी प्रसिद्ध असलेला 'हळद भंडारा' आता कायदेशीर चौकटीत येणार आहे. अन्न व औषध प्रशासन लवकरच जेजुरीतील भंडाऱ्यासाठी विशेष धोरण निश्चित करणार आहे, जे पारदर्शकता आणि शुद्धतेला प्राधान्य देईल. भाविकांच्या आरोग्यासाठी या संदर्भात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी निर्देश दिले आहेत.

जेजुरी गडकोटावर भंडारा उधळून आग लागल्याची घटना काही काळापूर्वी घडली होती. लोकप्रतिनिधींनी या घटनेबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर भंडाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी आणि पारदर्शकतेसाठी विशेष धोरण ठरविण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत आमदार विक्रम पाचपुते, आमदार महेश शिंदे, आमदार राजू नवघरे, तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव धीरजकुमार, आयुक्त श्रीधर डुबे पाटील आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

विविध देवस्थानांच्या ठिकाणी विकला जाणारा 'हळद भंडारा' शुद्ध हळदीच्या स्वरूपातच उपलब्ध असावा, तसेच विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार अन्न परवाना घेऊनच विक्री करावी, असे स्पष्ट निर्देश स्थानिक प्रशासनाला दिले जात आहेत. यामुळे भेसळयुक्त 'हळद भंडारा' विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे शक्य होणार आहे.

मंत्री नरहरी झिरवाळ यांनी प्रशासकीय यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून, त्याच्या मार्गदर्शनाखाली जेजुरी नगरपरिषद आणि आरोग्य विभागाने खालील उपाययोजना करण्याचे ठरवले आहे. मंदिर परिसरात भंडाऱ्याच्या वापराबाबत सुरक्षिततेचे नियम लागू करणे. भाविकांना शुद्ध भंडाऱ्याची ओळख व्हावी यासाठी ठिकठिकाणी माहितीफलक लावणे. आरोग्य विभागाद्वारे भंडाऱ्याच्या वापराबाबत आणि गुणवत्तेबाबत विशेष तपासणी मोहीम राबविणे. कायदेशीर दृष्टिकोनातून भंडाऱ्याचे वर्गीकरण महत्त्वाचे ठरणार आहे. सामान्यतः ' भंडारा" म्हणजे मोफत अन्न वितरण, परंतु जेजुरीत तो 'हळद भंडारा' या स्वरूपात पूजेसाठी वापरला जातो. जर हळदीचा वापर सौंदर्यवाढ किंवा उपचारासाठी केला जात असेल, तर तो औषध किंवा सौंदर्यप्रसाधन यामध्ये येतो, परंतु जेजुरीतला हळद भंडारा' 'धार्मिक विधी' आणि 'प्रसाद' म्हणून वापरला जातो. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन त्याचे विशेष नियमन करणार आहे. मंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटले, "जेजुरी हे महाराष्ट्राचे सुवर्ण मंदिर आहे. येथील भंडाऱ्याची शुद्धता राखणे ही आमची जबाबदारी आहे. भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान राखत त्यांना सुरक्षित आणि शुद्ध हळद भंडारा मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." या निर्णयामुळे जेजुरीतील भंडाऱ्याला कायदेशीर ओळख मिळणार असून, देवस्थानांच्या ठिकाणी भेसळ रोखण्यासाठी हा एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे.

# लोकसहभागातून आरोग्य समृद्धीकडे आरोग्य विभागाची वाटचाल

## 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती' स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी

मुंबई : हॅलो प्रभात

राज्यातील आरोग्य विषयक उपक्रम अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि बळकट करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने विधानसभा मतदारसंघ, जिल्हा आणि राज्य स्तरावर 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती' स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, राज्यातील आरोग्य संस्थांच्या कामकाजात अधिक समन्वय, गुणवत्ता सुधारणा आणि लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे वतीने राज्यातील सर्वसामान्य नागरिकाना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एमआरआय, सिटी स्कॅन, डायलेसिस, स्टेमी प्रकल्प, टेलिमेडिसीन यासह अनेक दर्जेदार व मोफत आरोग्य सुविधा ग्रामपंचायत स्तरापासून जिल्हा स्तरापर्यंत उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आरोग्यसेवा लोकाभिमुख करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 'माझ गाव आरोग्यसंपन्न गाव' हे महत्वपूर्ण अभियान सुरू आहे. त्याच महत्वकांक्षेने आरोग्य विभागाचे उपक्रम अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि बळकट करण्यासाठी आरोग्य विभागाने विधानसभा मतदारसंघ, जिल्हा आणि राज्य स्तरावर 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती' स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय आयुष अभियान तसेच राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत ग्रामीण व शहरी भागात आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये, सामान्य रुग्णालये, प्रादेशिक मनोरुग्णालये तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांसारख्या आरोग्य संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमार्फत नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून, त्यांचे अधिक बळकटीकरण करण्यासाठी नवीन समिती रचना लागू करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार, ग्रामीण विधानसभा मतदारसंघ, महानगरपालिका क्षेत्रातील विधानसभा मतदारसंघ, जिल्हा आणि राज्य स्तरावर स्वतंत्र 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती' गठित करण्यात येणार आहे. ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील समितीचे अध्यक्ष संबंधित आमदार असतील, तर तालुका आरोग्य अधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. समितीत खासदार, विधान परिषद सदस्य निमंत्रित सदस्य असतील, तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, तहसीलदार, गटविकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी, महिला व बाल विकास विभागाचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. महानगरपालिका क्षेत्रातील समित्यांमध्ये संबंधित आमदार अध्यक्ष असून, महापौर, उपमहापौर, आरोग्य समिति सभापती, खासदार व विधान परिषद सदस्य निमंत्रित सदस्य असतील, तसेच महानगरपालिका सदस्य, शिक्षण व महिला-बाल विकास विभागाचे प्रतिनिधी तसेच वैद्यकीय अधिकारी यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

**या निर्णयामुळे राज्यातील आरोग्य सेवांमध्ये लोकप्रतिनिधी, प्रशासन, आरोग्य विभाग आणि नागरिक यांच्यात अधिक प्रभावी समन्वय निर्माण होऊन आरोग्य सेवा अधिक पारदर्शक, परिणामकारक आणि लोकाभिमुख होण्यास मदत होईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला आहे.**

जिल्हा स्तरावरील समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री असतील, तर सहपालकमंत्री सह-अध्यक्ष म्हणून काम पाहतील. समितीत खासदार, विधान परिषद आमदार, महापौर, उपमहापौर, आरोग्य समिती सभापती, निमंत्रित सदस्य असतील, तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांचा समावेश असेल. राज्यस्तरीय 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती'चे अध्यक्ष सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री असतील, तर राज्यमंत्री सह-अध्यक्ष राहतील. समितीत सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, सचिव, आरोग्य सेवा आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अधिकारी आणि शहरी आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून सहभागी राहतील.

या समित्यांचे प्रमुख कार्य म्हणजे आरोग्य संस्थांमधील सेवा गुणवत्ता सुधारणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे, नागरिकांच्या आरोग्य समस्यांचे निराकरण करणे, विविध विभागांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे आणि समुदाय सहभाग वाढविणे हे राहणार आहे. तसेच जन आरोग्य समिती, रुग्ण कल्याण समिती, महिला आरोग्य समिती आणि ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांच्या माध्यमातून आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.सर्व गावे व आरोग्य संस्थासाठी कार्यरत असलेल्या या समिती सदस्यांच्या शिफारसीवर विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याचे काम"एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती करेल.

शासन निर्णयानुसार प्रत्येक समितीची दर तीन महिन्यांनी किमान एक बैठक घेणे बंधनकारक असून, समितीच्या बैठकीतील निर्णयांवर संबंधित अधिकाऱ्यांनी निश्चित कालावधीत कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करणे आवश्यक आहे. विधानसभा स्तरावरील समित्यांच्या कामकाजाचा आढावा जिल्हास्तर समिती घेणार असून, जिल्हास्तर समित्यांच्या कामाचा आढावा राज्यस्तरीय समितीमध्ये स्वत सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडून घेतला जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पंचक्रोशी विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**जामखेड : हॅलो प्रभात**

तालुक्यातील पंचक्रोशी विद्यालय, नायगाव येथे तब्बल १५ वर्षांनंतर आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थी व शिक्षकांचा गेट-टुगेदर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध बॅचमधील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. अनेक वर्षांनंतर एकत्र आल्याने उपस्थितांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणी सांगत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात सांस्कृतिक उपक्रम, मनोगते आणि विविध सादरीकरणांमुळे वातावरण आनंदमय झाले. शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी भविष्यात सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी परस्परांशी संवाद साधत जुन्या आठवणींना उजाळा दिला. भविष्यातही अशा प्रकारचे स्नेहमेळावे आयोजित करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. हा स्नेहमेळावा पंचक्रोशी विद्यालय, नायगावच्या इतिहासातील संस्मरणीय क्षण ठरला. यावेळी उगले सर, बहिर मॅडम, रामभाऊ उगले सर, साबळे सर, भारत बापू, राजगुरू सर, संतोष शिंदे तसेच माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी कृष्णा बहिर, अ‍ॅड. बशीर सय्यद, निलेश उगले, अक्षय उगले, संतोष जाधव, अक्षय थोरात, पूजा उगले, स्वाती उगले, अनिता बहिर, रुपाली सोनवणे आणि कावेरी उगले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पार्थ बहिर यांनी केले.

### राहुरीत प्रकाश आंबेडकरांचा वाढदिवस साजरा

**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रेल्वे स्टेशन परिसरातील कृपा वृद्धाश्रम येथे अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी वृद्धाश्रमाला पाण्याची टाकी, सिमेंटच्या गोण्या आदी आवश्यक वस्तूंची मदत करण्यात आली. तसेच वृद्ध नागरिकांना फळांचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. समाजातील ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर व्यक्त करत मानवतेची भावना जोपासण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष संतोष चव्हाण, प्रवक्ते अनिल जाधव, संपर्कप्रमुख पिंटू साळवे, नगरसेवक नागेश जाधव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



### सारिका रणदिवे राज्यस्तरीय सेवा पुरस्काराने सन्मानित

**राहुरी : हॅलो प्रभात**

शिक्षकी पेशाकडे केवळ नोकरी म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या करजगाव (ता. राहुरी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका श्रीमती सारिका रणदिवे यांना 'महाराष्ट्र शिक्षक पॅनल'च्या वतीने यंदाचा 'राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. शिर्डी येथे आयोजित दिमाखदार 'राज्यस्तरीय सेवा सन्मान सोहळ्या'त सिनेअभिनेत्री भार्गवी चिरमुले, प्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील, कवी रोहित शिंगे तसेच महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दीपक चामे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सारिका रणदिवे यांनी आपल्या कार्यकाळात विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक अभिनव शैक्षणिक उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या कलात्मक कौशल्यांना प्रोत्साहन देत विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. तसेच डिजिटल आणि कृतीशील अध्यापन पद्धतीचा प्रभावी वापर करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली आहे. याबद्दल शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी, करजगावचे ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समितीकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### वादळी पावसात कोसळलेली झाडे हटवून वाहतूक पूर्ववत

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



■ आ. विवेक कोल्हेंच्या सूचनेनंतर कार्यकर्त्यांची मदत

कोपरगावसह तालुक्यातील विविध भागांत अचानक आलेल्या वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून रस्त्यावर पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती. धामोरी परिसरातील झेड कॉर्नर ते धामोरी मार्गावर मोठी झाडे कोसळल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. दरम्यान, विवाह सोहळे आटोपून अनेक नागरिक आपल्या गावी परतत होते, तर काही जण हळदी समारंभ व इतर कौटुंबिक कार्यक्रमांसाठी प्रवास करत होते. अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली. या घटनेची माहिती आमदार विवेक कोल्हे यांना मिळताच त्यांनी तत्काळ कार्यकर्ते व माजी उपसभापती विजय साळुंके यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली. त्यानंतर विजय साळुंके यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत स्वतःच्या जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर पडलेली झाडे हटविण्याचे काम सुरू केले. काही वेळातच रस्त्यावरील अडथळे दूर करण्यात आले आणि वाहतूक पूर्ववत करण्यात आली. त्यामुळे अडकलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात शंभूजयंती उत्साहात

## शिव-शंभू गर्जना, प्रतिमा पूजन, 'छावा' चित्रपटाच्या प्रदर्शनाने शंभूराजांना अभिवादन

**पुणे : हॅलो प्रभात**




ढोल-ताशांचा निनाद, भगवी पताका, पहाडी आवाजातील गगनभेदी शिव-शंभू गर्जना, 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!', 'जय भवानी, जय शिवराय, जय शंभूराजे!' आणि 'नमो पार्वती पते, हर हर महादेव' या घोषणांच्या जयघोषात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात (एडीटी) महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. एमआयटी एडीटी विद्यापीठातील उर्मिलाताई कराड सभागृहात प्रतिमापूजन, शिव-शंभू गर्जना व विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या व्याख्यानाद्वारे स्वराज्याचे धाकटे छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. याप्रसंगी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयार आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शिवराय ढोल-ताशा पथकातील सदस्यांचा त्यांच्या पथकातील योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. व्याख्यानानंतर सभागृहात 'छावा' या चित्रपटाचे विशेष प्रदर्शन करण्यात आले. चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावरील प्रसंग मोठ्या पडद्यावर अनुभवताना सभागृहातील विद्यार्थ्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तर चित्रपटाचा शेवट पाहताना सभागृहातील वातावरण अतिशय भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

### छत्रपती संभाजी महाराजांमुळे महाराष्ट्रधर्म टिकला - डॉ. कराड

**याप्रसंगी व्याख्यानात प्रा. डॉ. कराड म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज हे ऊर्जेचा प्रचंड मोठा स्रोत आहेत. शिवरायांनंतर स्वराज्यावर चालून आलेली संकटांची मालिका छत्रपती संभाजी महाराजांनी लीलया पेलली. छत्रपती झाल्यानंतर त्यांनी पुढील नऊ वर्षे अविरत, न थकता असंख्य लढाया लढल्या आणि सर्वच जिंकल्या. त्यांच्या चिवट प्रतिकारामुळेच औरंगजेबाचे लाखोंचे बलाढ्य सैन्यही हतबल झाले. त्यामुळे संभाजी राजांचे इतिहासातील योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांच्यामुळेच खरंतर महाराष्ट्रधर्म टिकला, वाढला," असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.**

## कचरा संकलनासाठी पीएमपी बस डेपोची ३ हजार चौ.फु. जागा

**पुणे : हॅलो प्रभात**

बालेवाडी परिसरातील कचरा संकलन केंद्रासाठी जागेची कमतरता भासत असल्याने पीएमपी बस डेपोची मोकळी जागा उपलब्ध करून देण्याचा आली आहे. आज (ता. १४) स्थायी समितीच्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे. बाणेर-बालेवाडी भागातील रहिवाशांची संख्या, बाजारपेठ विस्तारल्याने कचरा निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. सोसायट्या, बाजारपेठेतून कचरा गोळा केल्यानंतर तो बालेवाडी येथील सेवा रस्त्याच्या लगत संकलित केले जातो. त्यानंतर हा वर्गीकरण केलेला कचरा विविध कचरा प्रकल्पांवर पाठवला जातो. सध्या कचरा संकलनासाठी उपलब्ध असलेली जागा कमी पडत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गालगत कचरा विखुरला जाऊन हा परिसर अस्वच्छता वाढत आहे, कर्मचाऱ्यांना रस्त्याच्या बाजूला बसून काम करावे लागतआहे. त्यामुळे कचरा संकलनासाठी कर्मचाऱ्यांना उघड्यावरच काम करावे लागत होते. त्यामुळे पीएमपीची जागा कचरा संकलनासाठी उपलब्ध करून द्यावी असा प्रस्ताव नगरसेविका मयूरी कोकाटे यांनी मांडला होता. त्यास मंजुरी देण्यात आली आहे. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना रस्त्यालगत साचलेला कचरा दिसत असल्याने महापालिकेच्या स्वच्छतेच्या प्रतिमेलाही धक्का बसत आहे.

## खुनाचा कट उधळला; युनिट-७ च्या पथकाची मोठी कारवाई

**वाघोली : हॅलो प्रभात**

गुन्हे शाखा युनिट-७ च्या पथकाने मोठी कारवाई करत खुनाचा कट रचणाऱ्या तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून तलवारी, बेसबॉल स्टिक, लाकडी दांडे आदी घातक शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई लोहगाव परिसरात करण्यात आली.

प्रकाश ऊर्फ दीपक शंकर चव्हाण (वय २४, रा. माळआडी, लोहगाव, पुणे), अनिकेत रामचंद्र चव्हाण (वय २५, रा. वीर, ता. पुरंदर, जि. पुणे), आकाश दीपक धनवटे ऊर्फ भावडी (वय २० रा. आदर्शनगर, लोहगाव, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

### तीनजण जेरबंद; तलवारींसह शस्त्रसाठा जप्त



याबाबत माहिती अशी की, गुन्हे शाखा युनिट-७ चे पथक गस्तीवर असताना पोलीस अंमलदार निलेश साळवे व प्रशांत कापुरे यांना एक संशयित अल्टो कारमधून धारदार हत्यारे घेवून जात असल्याची गोपनीय बातमीदारामार्फात खात्रीशीर माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी लोहगाव परिसरात सापळा रचून अल्टो कारसह ताब्यात घेतले. दरम्यान कारमध्ये असल्याचे पोलिसांना आढळून आले. त्यानंतर अधिक तपास केला असता हत्यार पुरवणारे अजून साथीदार ताब्यात घेतले. त्याच्या साथीदारांनी हत्यार पुरवल्याचे निष्पन्न झाले.

तसेच आरोपींनी पूर्व वैमनस्यातून बदला घेण्यासाठी खुनाचा कट रचल्याचे समोर आले. त्यांचेकडून दोन तलवारी, बेसबॉल स्टिक व लाकडी दांडे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी लोहगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आहे. सदरची कामगीरी अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, पोलीस उपआयुक्त विवेक मासाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे-२) राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-७ चे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संतोष सोनवणे, सहा. पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस अंलदार सारंग दळे, गिरीष नाणेकर, निलेश साळवे, प्रशांत कापुरे, विनायक साळवे, निर्णय लांडे, ऋषीकेश ताकवणे, सुहास तांबेकर, भरत गुंडवाड, नितीन धाडगे, किरण पलांडे, समाधान पाटील, प्रतिक्षा पानसरे, किर्ती मांदळे, सोनाली नरवडे यांनी केली आहे.

## जत तहसील कार्यालयात अपंगांसाठी सुविधांचा अभाव

**जत : हॅलो प्रभात**

### सुनिल बागडे ; प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी



शासन स्तरावर दिव्यांग नागरिकांसाठी विविध योजना, सवलती आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्याचे धोरण राबवले जात असले, तरी जत तहसील कार्यालयात येणाऱ्या अपंग पक्षकारांसाठी मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे विविध कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या दिव्यांग नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून प्रशासनाच्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

तहसील कार्यालयात दररोज उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, निवासी दाखले, जमीन विषयक कागदपत्रे, संजय गांधी योजना, निवडणूक व इतर शासकीय कामांसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. यामध्ये दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींचाही समावेश असतो. मात्र कार्यालय परिसरात व्हीलचेअरची सुविधा, रॅम्प, बसण्याची स्वतंत्र व्यवस्था, दिव्यांगांसाठी स्वच्छतागृह किंवा मदत कक्ष उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. विशेषतः शारीरिकदृष्ट्या अक्षम नागरिकांना कार्यालयाच्या विविध विभागांमध्ये जाण्यासाठी जिने चढावे लागत असल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. काही दिव्यांग नागरिकांना आपल्या नातेवाईकांच्या मदतीशिवाय कार्यालयीन काम करणे अशक्य बनत असल्याचेही सांगण्यात येत आहे. अनेक वेळा तासन्तास प्रतीक्षा करूनही योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. केंद्र व राज्य शासनाने "सुगम भारत अभियान" अंतर्गत सर्व शासकीय कार्यालये दिव्यांगांसाठी सुलभ करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र प्रत्यक्षात जत तहसील कार्यालयात या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप नागरिकांतून केला जात आहे. दिव्यांग नागरिकांसाठी स्वतंत्र मदत कक्ष सुरू करणे, रॅम्प व व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करून देणे, बसण्याची व्यवस्था करणे तसेच आवश्यक ठिकाणी मार्गदर्शक फलक लावणे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन दिव्यांग नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा संबंधित विभागाविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष सुनील बागडे यांनी दिला आहे.

## नदी काठ सुधारसाठी मिळाली ५२ हजार चौरस मिटर जागा

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महापालिकेने सुमारे साडे तिनशे कोटी रुपये खर्च करून संगमवाडी ते बंडगार्डन पूल या दरम्यान मुळामुठा नदीचा काठ सुशोभित करण्याचे काम सुरु केले. पण यामध्ये भूसंपादन न झाल्याने प्रकल्प रखडला आहे. हा भूसंपादनाचा तिढा सोडविण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने तब्बल ५२ हजार ८५१ चौरस मिटर एवढी शासकीय जमीन विनामूल्य महापालिकेला हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या प्रकल्पाला गती मिळणार आहे. महसूल विभागाच्या पुढाकारातून घेण्यात आलेल्या या निर्णयानुसार संबंधित जमीन महसूलमुक्त आणि भोगवटा मूल्याशिवाय महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे प्रकल्पातील अडथळे दूर होऊन नदी सुधारणा, पूरनियंत्रण आणि हरित विकासाची कामे वेगाने मार्गी लागण्याची शक्यता आहे.

मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत नदीची पूराचे पाणी वाहून देण्याची क्षमता वाढविणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून शुद्ध पाणी नदीत सोडणे, तसेच नदीकाठी हरित पट्टा आणि जॉगिंग ट्रॅक विकसित करणे अशी प्रमुख कामे करण्यात येणार आहेत. शहराच्या पर्यावरणीय समतोलासोबतच नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे.

## रुग्णालयात घातपाताचाच डाव! हडपसरमधील रुग्णालयात सापडलेली वस्तू आयईडी

**पुणे : हॅलो प्रभात**

हडपसर परिसरातील रुग्णालयात बुधवारी सायंकाळी सापडलेली संशयास्पद वस्तू ही केवळ बॉम्बसदृश नसून ती प्रत्यक्षात इम्प्रुव्हाईज्ड एक्सप्लोसीव्ह डिव्हाईस (आयईडी) तयार करण्यासाठी वापरण्यात आलेले स्फोटक उपकरण असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, रुग्णालयात घातपात घडविण्याचा डाव होता का? याचा तपास आता दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) तसेच पुणे पोलिसांकडून सुरू केला आहे. हडपसर भागातील कामधेनू इस्टेटच्या मागील बाजून हे खासगी रुग्णालय आहे. या रुग्णालयाच्या पहिल्या मजल्यावरील शौचालयात बुधवारी (ता.१३) सायंकाळी एका व्यक्तीला संशयास्पद वस्तू आढळून आली. या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे, वस्तू बॉम्बसदृश दिसत असतानाही रुग्णालय प्रशासनाने व वरिष्ठ डॉक्टरांनी ती वस्तू पहिल्या मजल्यावरील शौचालयातून बाहेर काढून मोकळ्या मैदानात ठेवली आणि त्यानंतर पोलिसांना माहिती दिल्याचे तपासात समोर आले आहे. याबाबतची माहिती पोलिस नियंत्रण कक्षाला देण्यात आली. आयईडीवर लावण्यात आलेली वस्तू हे टायमर नव्हते. कारण त्यातील वेळ ही घडाळ्याप्रमाणे सुरू होती. त्यात असलेली सात वाजण्याची वेळ ही स्फोट होण्याची नव्हती. तसेच तशी फ्यूज देखील आयईडीमध्ये नव्हती, असे तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी रुग्णालय परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून, त्यामध्ये दिसून आलेल्या एका तरुणासह १५ ते १७ जणांची कसून चौकशी करण्यात आली. मात्र, प्राथमिक तपासात त्यांचा या प्रकरणाशी संबंध नसल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना चौकशीनंतर सोडून देण्यात आले.

# इथेनॉल इंधनाला सर्वोत्तम पर्याय : बाळासाहेब थोरात

### थोरात कारखान्यातून 1 कोटी 40 लाख लिटर इथेनॉल निर्मिती

**संगमनेर : हॅलो प्रभात**




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्तीवर कारखान्यासह सर्व संस्थांची वाटचाल सुरू असून, थोरात सहकारी साखर कारखान्यातून दारू निर्मिती न करता औद्योगिक अल्कोहोलची निर्मिती केली जात असल्याचे प्रतिपादन बाळासाहेब थोरात यांनी केले. वाढत्या इंधन समस्येला इथेनॉल हा प्रभावी पर्याय ठरत असून, त्याचे महत्त्व आता संपूर्ण जगाला पटले असल्याचेही त्यांनी सांगितले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कारखान्याच्या इथेनॉल निर्मिती प्रकल्पातून चालू हंगामात १ कोटी ४० लाख लिटर इथेनॉल निर्मिती झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, उपाध्यक्ष पांडुरंग पाटील-घुले, युवक काँग्रेस अध्यक्षा डॉ.जयश्री थोरात, संचालक संपतराव गोडगे, सतीश वर्पे, विलास शिंदे, रामनाथ कुटे, विजय राहाणे, गुलाबराव देशमुख, अरुण वाकचौरे, अंकुश ताजणे, मदन आंबरे, लताताई गायकर, सुंदराबाई दुबे, हौशीराम सोनवणे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सचिव किरण कानवडे, कृष्णा दिघे, भारत देशमुख, अशोक मुटकुळे, नवनाथ गडाख, संजय पाटील यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते. बाळासाहेब थोरात म्हणाले, राज्यातील अनेक सहकारी साखर कारखान्यांमध्ये अल्कोहोलपासून दारूची निर्मिती केली जाते. मात्र सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या विचारांवर आणि आदर्श शिस्तीवर चालणाऱ्या या कारखान्यात औद्योगिक अल्कोहोलची निर्मिती केली जाते. तरीही कारखान्याने सातत्याने चांगली प्रगती करत ऊस उत्पादकांना उच्चांकी दर दिला आहे. वीज निर्मिती आणि इथेनॉल प्रकल्पामुळे कारखान्याला मोठा आधार मिळत असल्याचे सांगताना त्यांनी युरोपीय देशांतील युद्धामुळे जागतिक स्तरावर इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याचे नमूद केले. देशातही पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या समस्येमुळे इथेनॉलचे महत्त्व वाढले असून, इथेनॉल निर्मिती करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांसाठी केंद्र सरकारने रास्त दर निश्चित करावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

प्रास्ताविक जगन्नाथ घुगरकर यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष पांडुरंग पाटील घुले यांनी मानले. कार्यक्रमास पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.